# LIB 013

# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य

ज्ञानगंगा घरोघरी


*संपादक*

डॉ. मधुकर शेवाळे

*कार्यकारी संपादक*

प्रा. प्रवीण घोडेस्वार

*संपादक मंडळ*

डॉ. राजेंद्र कुंभार, पुणे
डॉ. मोहन खेरडे, अमरावती
डॉ. धर्मराज वीर, औरंगाबाद
डॉ. नमिता खोत, कोल्हापूर
डॉ. मंगला हिरवाडे, नागपूर
प्रा. प्रकाश बर्वे, नाशिक



© २०१७ *यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक*



*निर्मिती*

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ

*अक्षरजुळणी*

श्री. विजय अहिरे, विजय एन्टरप्रायझेस्, हनुमान चौक, गणेश चौक, नवीन नाशिक

*मुद्रक*

श्री. अरविंद पोतनीस, श्री ऑफसेट प्रेस, ७ ए, नाईस, सातपूर, नाशिक – ७

*प्रकाशक*

डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२


---


**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**वर्गणी व व्यवस्थापन –** डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.

**संपादकीय (साहित्य पाठविण्यासाठी) –** डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.


● या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

ज्ञानगंगोत्री

वर्ष १७वे ज्ञानगंगोत्री : डिसेंबर २०१६, जाने., फेब्रु. २०१७ अंक ३

ISSN 2231-6507

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| ❑ | संपादकीय | | २ |
| ❑ | अर्कहार्टप्रणीत ग्रंथालय व्यवस्थापनाची अठरा सूत्रे (भाग-१) | श्रीमती वेदवती हब्बू | ३ |
| ❑ | अर्कहार्टप्रणीत ग्रंथालय व्यवस्थापनाची अठरा सूत्रे (भाग-२) | श्रीमती वेदवती हब्बू | ८ |
| ❑ | ग्रंथालयशास्त्राची तात्त्विक बैठक (भाग १) | प्रा. म. रा. रिसवडकर | १५ |
| ❑ | ग्रंथालयशास्त्राची तात्त्विक बैठक (भाग २) | प्रा. म. रा. रिसवडकर | २२ |
| ❑ | आधुनिक ग्रंथालयात क्लाऊड स्टोअरेजचा वापर | श्री. प्रकाश बर्वे<br>श्री. शैलेश शुक्ल | २५ |
| ❑ | अजून ताजा वास जुन्याला : भारतीय ग्रंथ संरक्षण कायद्याची शताब्दी | प्रा. अ. का. प्रियोळकर | ३५ |



| | | |
|---|---|---|
| सुट्या अंकांची किंमत | : संस्था रु. १०० | व्यक्ती : रु. ३० |
| वार्षिक वर्गणी | : संस्था रु. ४०० | व्यक्ती : रु. १२० |

मागील अंक उपलब्धतेनुसार पाठविले जातील. वर्गणीचा धनाकर्ष (डीडी) ‘वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक’ या नावे काढलेला आणि नाशिक येथे देय असावा.

NB-16-17-96



# संपादकीय

तत्त्वे, सूत्रे, नियम, कायदे आदिंचा आपण नियमित व्यवहारामध्ये उपयोग करत असतो. कोणतीही प्रणाली सुव्यवस्थितपणे चालण्यासाठी या बाबी महत्त्वपूर्ण असतात. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्येही अशा तत्त्वांचे उपयोजन करण्यात येत असते. व्यवस्थापनाच्या कार्यांचे उपयोजन आपण ग्रंथालये सुव्यवस्थित चालण्यासाठी करीत असतोच. नियोजन, संघटन, सेवक व्यवस्थापन, नेतृत्वगुण, नियंत्रण ही ती व्यवस्थापकीय कार्ये होत. ग्रंथालय शास्त्राच्या विकासासंदर्भातही मार्गदर्शक तत्वांची मांडणी करण्यात आलेली आहे. डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी सांगितलेली पंचसुत्री आजही निश्चितच उपयुक्त ठरत आहे. याव्यतिरिक्त अर्कहार्ट यांनी अठरा सुत्रे सांगितलेली आहेत, ती सिद्धांतासारखी वापरून ग्रंथालयीन कामकाज आणि विकासासाठी त्यांचा मार्गदर्शक म्हणून उपयोग होत असतो. अर्धशतकापूर्वी सांगितलेली तत्त्वे अद्यापही ताजी आहेत. त्याचबरोबर वाचनसाहित्याच्या निवडीसाठी ड्युए. डरूरी, मॅककॉलव्हीन, रंगनाथन यांचे तत्त्वांचे उपयोजन करण्यात येते. वाचनसाहित्य संग्रहाचा विकास (Collection Development) करण्यासाठी ही तत्त्वे मार्गदर्शक ठरतात.

प्रस्तुत अंकामध्ये अर्कहार्टच्या १८ सुत्रांचे विवेचन श्रीमती. वेदवती हब्बु यांनी दोन लेखांमध्ये मांडले आहे. याशिवाय ग्रंथालयशास्त्राची तात्त्विक बैठक प्रा. म. रा. रिसवडकर यांनी केलेली आहे. तात्त्विक बैठकीत विविध तत्त्वांचे उपयोजन ग्रंथपालनात कसे करावे याचा उहापोह करण्यात आला आहे. हे चारही लेख अतिशय महत्त्वपूर्ण आरि आजच्या स्थितीतही मार्गदर्शक आणि उपयुक्त असल्याने पुनर्प्रकाशित करण्यात येत आहेत. माहिती तंत्रज्ञानाधारित क्लाऊड कॉम्प्युटिंग वरील लेख त्याचबरोबर अजुन ताजा वास जुन्याला अंतर्गत भारतीय ग्रंथसंरक्षण कायद्याची शताब्दी यावर अ. का. प्रियोळकरांचा पन्नास वर्षापूर्वीचा लेख येथे सादर केलेला आहे.

***डॉ. मधुकर शेवाळे***
संपादक

# अर्कहार्टप्रणीत ग्रंथालय

## व्यवस्थापनाची अठरा सूत्रे (भाग-१)

*-श्रीमती वेदवती हब्बू*
निवृत्त ग्रंथालय व्यावसायिक,
जवाहरलाल नेहरू ग्रंथालय, मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथपालांना मार्गदर्शक ठरेल अशी पंचसूत्री प्रसारित केली. तिचे स्वरूप एवढे व्यापक आहे, की ग्रंथालयांच्या सतत बदलत्या स्वरूपातदेखील ती अबाधित ठरली आहे व भविष्यातही तशीच राहील. याचे प्रमुख कारण म्हणजे तिचे स्वरूप सिद्धांतासारखे आहे. त्यात भरपूर लवचीकता आहे. ग्रंथपालन व्यवसायाचे मर्म ज्यांना कळले आहे, ते तिचा योग्य अर्थ लावू शकतील. त्यामध्ये कदाचित एखाद्याच्या कुवतीनुसार अनावश्यक लवचीकता व कदाचित चुकीचा अर्थ लावला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्रंथपालास अधिक स्पष्ट, व्यवहारी आणि काळानुसार योग्य अशा मार्गदर्शक सूत्रांची गरज होती. ती सूत्रे राबविण्यासाठी काही कार्यप्रवण सूचनांची गरज होती. ती गरज डॉ. अर्कहार्ट यांच्या सूत्रांनी भागविली आहे. ही सूत्रेदेखील जवळजवळ अर्धशतकापूर्वी प्रसृत झालेली असली तरी अद्यापही ताजी आहेत. म्हणून ती व त्यांमागील विचार समजावून घेणे उत्तम ग्रंथालय व्यवस्थापन आणि ग्रंथालय सेवा देणाऱ्या ग्रंथपालास आवश्यक आहे. विशेषतः त्यांची उजळणी नवीन ग्रंथपालास जास्त मार्गदर्शी ठरेल.

ग्रंथालय बांधणी, त्यांचे दैनंदिन व्यवस्थापन, काळाचे भान आणि ग्रंथालयाचे अंतिम उद्दिष्ट यांचा सामूहिक विचार करणारी ही अठरा सूत्रे पुढीलप्रमाणे आहेत. मराठीत भाषांतर / रूपांतर करताना मूळ सूत्रातील आशय नीट व्यक्त न होण्याची शक्यता लक्षात घेऊन ती प्रथम इंग्रजीत दिली आहेत. त्यांचे विवरण लेखिकेने आपल्या कुवतीनुसार केले आहे. त्याबाबत मतभिन्नता असण्याची शक्यता आहे. सुविधा व अनुभवी ग्रंथपाल - वाचकांच्या त्याबाबतच्या प्रतिक्रिया लेखिकेस मोलाच्या वाटतील.

**सूत्र १ ले-** Libraries are for Users- ग्रंथालये वाचकांसाठी आहेत. हे सूत्र डॉ. रंगनाथन यांच्या पहिल्या सूत्रासारखे असले तरी अर्कहार्ट वाचकास Users म्हणजे वापर करणारा असा शब्द वापरतात. ग्रंथालय केवळ ग्रंथवाचकांसाठीच नव्हे तर ग्रंथालयाच्या विविध सेवांचा लाभ घेणाऱ्यांसाठी आहे, असा सूक्ष्म भेद त्यातून व्यक्त



होतो. ग्रंथालयाचा उपयोग कसा केला जाईल याकडेही ग्रंथपालांनी बारकाईने लक्ष दिले पाहिजे. जर उपयोग केला जात नसेल तर त्याची कारणे शोधून उपयोग केला जाईल असे व्यवस्थापन केले जाणे हेही त्यास सुचवावयाचे आहे. या सूत्राद्वारे ग्रंथपालांवर ते अधिक जबाबदारी टाकताहेत व कालमानानुसार ते योग्य आहे.

**सूत्र २रे-** The Failures of an Information supply system to satisfy its users are as a rule not obvious- माहिती प्रतिप्राप्तीच्या ग्रंथालयीन पद्धतीचे अपयश हे सदैव सहज आकलनीय असतेच असे नाही. माहितीच्या गरजा भागविण्यासाठी ग्रंथपालांनी योजिलेले उपाय, क्लृप्त्या अनेकदा फसतात. वाचक असमाधानी राहतो (म्हणून ग्रंथपालही नाराज असतो). पण म्हणून त्यास ग्रंथपालच सर्वस्वी जबाबदार आहे असे नाही. माहिती हे असे अजब मिश्रण आहे, की तिचे सर्वांगीण आकलन होऊन तिच्यावर हमखास प्रतिप्राप्ती होईल, असे संस्करण करणे कठीण आहे. थोडक्यात, ग्रंथपालांच्या कुशलतेवरही मर्यादा आहेत.

**सूत्र ३रे-** Supply creates demands- पुरवठ्याच्या शाश्वतीमुळे मागणी वाढते. सर्व ग्रंथपालांचा हा अनुभव आहे, की ग्रंथालय सेवांमुळे हा वाचक जसजसा समाधानी होत जातो तसतशी त्याची मागणी वाढत जाते. ग्रंथपाल व ग्रंथालयाच्या विकासासाठी जबाबदार व्यक्ती वा संघटनांनी हा विचार ध्यानात घेतला पाहिजे, की मागणी आली तर पुरवठा करू, हे तत्त्व ग्रंथालयास लागू नाही. कारण ग्रंथालयाची सेवा ही केवळ प्रतिसादी स्वरूपाची नाही. ती निर्मितीस हातभार लावणारी आहे. निर्मिती झाल्याशिवाय मागणी कशी येईल? म्हणून निर्मिती होण्यासाठी ग्रंथालयांनी साकारले पाहिजे.('आहेत ती पुस्तके अगोदर वाचा मग नवीन पुस्तके घेण्याचे बघू' असे म्हणून ग्रंथालयास निधी नाकारणारे वरिष्ठ अधिकारी आपल्या देशात आहेत तर मग, सनदी अधिकारी असे असले तर काही नवल!) आणि त्याचबरोबर ग्रंथालयांनी आम्हास घडवले, ग्रंथालय नसते तर ही निर्मिती झालीच नसती असे आवर्जून सांगणारे प्रथितयश संशोधक, लेखक, कलाकार, वर्तमानपत्रांचे संपादक असंख्य आहेत. याच प्रक्रियेची परिणती म्हणून ग्रंथालय सेवांना अंतराळ हीच सीमा आहे (Sky is the Limit), ही शिकवण ग्रंथालय प्रशिक्षणात दिली जाते.

**सूत्र ४थे-** Users must be provided with guides so that they can select the records which may interest them- वाचकांना त्यांच्या आवडीचे साहित्य निवडण्यास सोपे जावे यासाठी ग्रंथालयांनी विविध विभागदर्शक मार्गदर्शिका पुरविल्याच पाहिजेत. विभागदर्शक मार्गदर्शिका ही केवळ मोठ्या ग्रंथालयांचीच गरज आहे असे नाही. छोट्या ग्रंथालयांसही त्यांची आवश्यकता आहे. कितीही सुशिक्षित वाचक असला तरी कोणत्याही ग्रंथालयात तो प्रथम गेला की भांबावतोच.

ग्रंथालयातील आपल्या ग्रंथाकडे (वा प्रलेखाकडे ) त्वरेने जाण्याची वा त्याकरता वेळ खर्च करावा लागू नये अशी प्रत्येक वाचकाची इच्छा असते. प्रत्येक वेळी ग्रंथालय सेवक मार्गदर्शनासाठी उपलब्ध नसतो. म्हणून अशा गाईड्सची गरज आहे. यात प्रथम परिसराच्या प्रवेशद्वाराजवळ ग्रंथालय कोठे आहे याची माहिती देणारा नकाशा, त्यानंतर ग्रंथालयाच्या प्रवेशद्वारावर संपूर्ण ग्रंथालयाचा नकाशा, नंतर विभागाकडे जाण्याचे मार्ग, विभागातील उपविभागांच्या निर्देशक पाट्या, येथपासून तो ग्रंथावरील लेबल्स, कॅटलॉगच्या प्रत्येक कॅबिनेटवरील नोंद, प्रत्येक कॅबिनेटमधील नोंदींच्या विभागांचे दर्शक, इत्यादी बारीक-सारीक स्थानदर्शक पाट्यांचा अंतर्भाव होतो. या सूत्राद्वारे अर्कहार्ट असेही सुचवीत आहेत, की ग्रंथांचे वर्गीकरण नीट झाले पाहिजे. तालिकापत्रांची क्रमवारी कटाक्षाने राखली पाहिजे, कपाटातील पुस्तकांची रचना काटेकोरपणे राखली गेली पाहिजे. व्यवस्थापनातील बारीकसारीक बाबींना अर्कहार्ट किती महत्त्व देतात, हे लक्षात येईल.

**सूत्र ५वे –** Libraries must be able to provide adequate access to the records. User may wish to consult- सर्वस्वी मुक्तद्वार पद्धतीबाबत डॉ. रंगनाथन आग्रही होते. अर्कहार्ट त्याच मालिकेतील आहेत. मात्र त्यांनी पुरेसे (Adequate) हा अत्यंत व्यवहार्य शब्द वापरला आहे. त्यांना असे सुचवावयाचे आहे, की वाचकांना हव्या असलेल्या साहित्याच्या उपलब्धतेवर निर्बंध नसावेत; पण नियम आवश्यक आहेत; हे नियमही जाचक असता कामा नयेत. वाचकांनुसार ते लवचीक असले पाहिजेत. ग्रंथालयीन सहकाराच्या (Library Co-operation) वा सहभागाच्या तत्त्वावर ग्रंथालय साहित्याच्या उपयोगाच्या (Resource – sharing) पुरस्कार करण्याच्या आजच्या मानसिकतेच्या पार्श्वभूमीवर – Access- या शब्दास ओळख, परिचय वा मर्यादित उपलब्धता असा प्राप्त झालेला अर्थ (Access verses Ownership) लक्षात घेतला तरी ह्या सूत्रास बाधा येत नाही. उलट उजळाच येतो. डॉ. रंगनाथन यांच्या Every reader, his book या सूत्राशी याचे जवळचे नाते आहे. पण अर्कहार्टच्या सूत्रातील संदेश कार्यप्रवणतेकडे, कार्याची दिशा दाखविण्याकडे आहे, हा फरक लक्षात घेतला पाहिजे, असेही म्हणता येईल की, डॉ. रंगनाथन यांच्या सूत्रास अर्कहार्टनी कार्यवाहीची झालर लावून ते अधिक स्पष्ट केले आहे.

**सूत्र ६वे–** Libraries have to be paid for- ग्रंथालय सेवेसाठी शुल्क आकारले पाहिजे. हे सूत्र अगदी क्रांतिकारक आहे. ग्रंथालय सेवांच्या युगानुयुगे प्रस्थापित तत्त्वांना धक्का देणारे आहे. पण हेही लक्षात घेतले पाहिजे की ते जितके आवश्यक आहे तितकेच परंपरागत सत्य आहे. विद्या, ज्ञान, शिक्षण याबरोबरच ग्रंथालय सेवा ही मोफतच असावी असे पारंपरिक मत आहे व ते आचरणात आणले



जात होते. पण एक गोष्ट विसरली जात होती, की त्यासाठी खर्च होतच होता व कोणीतरी तो केल्याशिवाय ग्रंथालय सेवा अस्तित्वातच येऊ शकत नव्हती. जेव्हा ती मोफत होती तेव्हा सरकार खर्च करीत होते व ते कोठून तर जनतेकडून येणाऱ्या कराच्या स्वरूपातील उत्पन्नामधून. अर्कहार्ट फक्त एवढेच सांगतात, की अशा अप्रत्यक्ष घेतल्या जाणाऱ्या शुल्काऐवजी प्रत्यक्ष शुल्क आकारावे. याचा एक फायदा असा व तो अत्यावश्यक आहे की, आपण जी सेवा घेतो तिला आर्थिक मूल्य आहे, तेव्हा ते दिल्यानंतर त्या सेवेचा नीट उपयोग केला पाहिजे. फुकट मिळेल त्याला मूल्य नसते, अशा मानवी प्रवृत्तीनुसार फुकट मिळणाऱ्या ग्रंथालय सेवांबद्दल जी एका बाजूस उपेक्षेची व दुसऱ्या बाजूस दुरुपयोगाची भावना वाचकांच्या/उपभोक्त्यांच्या मनात असते व त्याची सामूहिक परिणती ग्रंथालय सेवांच्या सार्वजनिक अवमूल्यनात होते त्यावर हा घणाघाती उपाय अर्कहार्टनी सुचविला आहे. ग्रंथालये ही खर्चाची बाब आहे. त्यातून उत्पन्न काही नाही, म्हणून आजच्या व्यवहारी जगात त्यांच्याकडे कुचेष्टेने पाहिले जाते. त्यावर उपाय म्हणून अर्कहार्टने हे सूत्र मांडले. ग्रंथालय सेवकांमध्येही आपण 'अर्थ' पूर्ण काम करीत असल्याची भावना निर्माण होईल, मूल्याच्या बदल्यात सेवा देण्याची जबाबदारी पडल्यामुळे, सेवेच्या गुणवत्तेकडे त्यांच्याकडून लक्ष दिले जाईल, हाही एक दृष्टिकोन या सूत्रात अंतर्भूत आहे. ग्रंथालयावरील सर्व खर्च मूल्याधारित सेवा दिल्यामुळे वसूल होईल असे कोणीच मानणार नाही; पण मूल्य आकारण्यामुळे ग्रंथालयास नैतिक बळ प्राप्त होईल व ग्रंथालय सेवांचा आदर होऊन त्यांचा अपेक्षित उपयोग होऊ शकेल. मूल्याधारित सेवांच्या मर्यादा ध्यानात घेऊन ग्रंथपालांनी या सूत्राचे पालन करावे.

**सूत्र ७वे –** Libraries, both individually and collectively, must have regard for cost effectiveness- एका ग्रंथालयाने तसेच समुच्चयाने किंवा एकाच ग्रंथालयाच्या विविध विभागांनी एकत्रितपणे ग्रंथालयावर होणारा खर्च आणि त्यापासून मिळणारे फायदे यांचे भान सदैव राखले पाहिजे. कोणताही खर्च हा काहीतरी फायदा देणारा असला पाहिजे व त्या खर्च आणि फायद्यात किमान पातळीवर समन्वय असला पाहिजे. अंतिमतः सर्व बाबी पैशाशी येऊन पोहोचतात. या व्यावहारिक सत्याचे भान ग्रंथपालांनी राखले पाहिजे असा ''धरणी'' वरचा सल्ला या सूत्राद्वारे अर्कहार्ट यांनी दिला आहे. तत्त्वे कितीही उदात्त असोत, समाजाच्या भल्यासाठी असोत, मानवतेच्या कल्याणासाठी असोत ती हवेत साकारता येत नाहीत. त्यासाठी पैशाची आवश्यकता असते आणि पैसा सदैव दुर्मीळ असतो. योग्य उपयोग अपेक्षित किमान फायदे असल्याशिवाय तो उपलब्ध होत नाही, झाला तरी खर्च करू नये असा सल्ला अर्कहार्ट देतात तो योग्य नाही असे कोण म्हणेल?

**सूत्र ८वे –** Information cannot be valued as a rule in monetory terms- माहितीचे मूल्य हे सदैव आर्थिक दृष्ट्या करता येणार नाही. सहाव्या व सातव्या सूत्रास छेद देणारे हे सूत्र आहे की काय याची वरवर पाहता शंका उत्पन्न व्हावी. असे हे सूत्र वस्तुतः छेद देणारे नाही; पण त्यांच्या मर्यादा सांगणारे आहे व त्या सूत्राच्या चुकीच्या दिशेने ताणल्या जाण्याच्या शक्यतेवर तोडगा अशा स्वरूपाचे आहे. त्रिकालाबाधित सत्य असलेला नियम म्हणून माहितीला आर्थिक मूल्य आहे असे मानू नका. माहिती जीवनास आवश्यक आहे. तिला किंमत पडते, पण अन्य जीवनावश्यक बाबींप्रमाणे तिच्या किमतीकडे पहावयाचे नसते. जीवनास पाणी आवश्यक आहे, आरोग्य सेवा आवश्यक आहेत. त्यांना आर्थिक मूल्य आहेच, पण 'अर्थ' नाही म्हणून पाण्यावाचून व आरोग्यसेवेवाचून कोणी कोणास मरू देत नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक वेळी माहितीचे काटेकोरपणे आर्थिक मूल्य तपासणे चूक आहे. माहिती ही इतकी विविधांगी आहे की तिचा उपयोगही केवळ अर्थ जनकच असेल असे मानणे चूक आहे. केवळ नैसर्गिक जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी माहिती हवी असते. केवळ मनःशांतीसाठी माहिती हवी असते. अशा माहितीकडे आर्थिक दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे आहे. नव्हे, आर्थिक मूल्य नसणारी पण मानवास आवश्यक असणारी माहिती असतेच हे सत्य स्वीकारले पाहिजे. त्यानुसारच ग्रंथालय सेवांकडे पाहिले पाहिजे. ग्रंथपालन व्यवसायाकडे ग्रंथपालांनी आणि समाजाने पाहिले पाहिजे, हा या सूत्राचा अर्थ आहे.

**सूत्र ९वे –** Libraries must have regard to the law of deminishing returns- जसजसा जास्त पुरवठा केला जातो तसतसे त्याचे फायदे कमी होतात या अर्थशास्त्रातील सिद्धांताची जाणीव ग्रंथपालांनी ठेवावी.

सध्याच्या युगात अत्यंत मोलाचे असणारे हे सूत्र जरा जास्त विस्ताराने चर्चिले जाणे आवश्यक आहे. विस्तारभयास्तव या व पुढील नऊ सूत्रांचा विचार या लेखाच्या दुसऱ्या भागात करू.



# अर्कहार्टप्रणीत ग्रंथालय

## व्यवस्थापनाची अठरा सूत्रे (भाग –२)

*–श्रीमती वेदवती हब्बू*
निवृत्त ग्रंथालय व्यावसायिक,
जवाहरलाल नेहरू ग्रंथालय, मुंबई विद्यापीठ, मुंबई

मागील लेखात प्रसिध्द झालेल्या व्यवस्थापन सूत्रांचा हा पुढील भाग व्यवसायात कार्यरत असलेल्या ग्रंथपालास उद्‌बोधक वाटेलच; पण ग्रंथालयाशी संबंधित अधिकारी वर्ग, वित्त अधिकारी यांनाही ग्रंथपालन कार्याचे नेमके स्वरूप समजण्यास हे दोन्ही लेख उपयुक्त ठरतील.

**सूत्र ९वे –** Libraries must have regard to the law of diminishing returns- जसजसा जास्त पुरवठा केला जातो तसतसे त्याचे फायदे कमी होतात या अर्थशास्त्रातील सिध्दांताची जाणीव ग्रंथालयांनी ठेवावी. या सूत्राचा विचार आर्थिक सिध्दांताच्या आधारानेच करावयाचा आहे. अर्थशास्त्रातील सिद्धांतानुसार काही मर्यादेनंतर एखाद्या वस्तूचे उत्पादन, उत्पादक घटकांच्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात येऊ लागते. उदाहरणार्थ, सुरुवातीच्या काळात ८ तासांमध्ये जेवढे काम होईल तेवढेच काम काही कालावधीनंतर ८ तासांत होणार नाही; कमी होईल. हाच नियम ग्रंथालय व्यवस्थापनालासुद्धा लागू होतो हे ग्रंथपालांनी लक्षात ठेवावे, असे अर्कहार्ट सांगतात. काही उदाहरणे देऊन हे स्पष्ट करता येईल. एखादा विषय नवीन असेल तेव्हा त्यावरील घेतलेल्या पहिल्या पुस्तकाचे वाचकांना जे अप्रूप वाटेल तेवढे त्याच विषयावरील पुढे घेत गेलेल्या प्रत्येक पुस्तकाबद्दल वाटणार नाही. किंबहुना प्रत्येक पुस्तकागणिक कमी होत जाईल. एखादी सेवा नव्याने सुरू केल्यानंतर प्रथम मिळणारा वाचकांचा प्रतिसाद व तिच्याबद्दलचा कर्मचाऱ्यांचा उत्साह हा हळूहळू कमी होत लाईल. कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली किंवा ग्रंथालयाची इमारत विस्तारित केली तर वाढविलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याकडून प्रमाणापेक्षा कमी काम मिळेल अथवा विस्तारित इमारतीच्या जागेतील प्रत्येक चौरसफुटाचा उपयोग पूर्वीच्या जागेतल्या जागेच्या उपयोगाच्या प्रमाणात कमी होईल. अर्कहार्ट हे धरणीवर पाय असलेले ग्रंथपाल होते. ग्रंथालय व्यवस्थित चाललेच पाहिजे या मताचे होते. त्यामुळे व्यवस्थापनातील बारीकसारीक मुद्द्यांबाबत किती जागरूक होते हे लक्षात येईल. ग्रंथालयास पुरेशी जागा, पैसा व मनुष्यबळ मिळत नाही अशी सदैव रड गाऊन ते

मिळविण्यासाठी सतत धडपडणाऱ्या ग्रंथपालांना अर्कहार्टनी संपूर्ण व्यावहारिकतेने वागण्याचा सल्ला या सूत्राद्वारे दिला आहे असेच म्हणावे लागेल.

**सूत्र १०वे –** 'The best is the enemy of the Good' म्हणजे पूर्णत्वाच्या नादात किमान गुणवत्तेच्या वस्तूची निर्मिती वा काम होणे राहूनच जाते. काहीशी मराठीतील ''खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी'' या म्हणीशी याचे साधर्म्य आहे. पुन्हा एकदा अर्कहार्ट यांच्या व्यावहारिकतेचे दर्शन घडविणारे हे सूत्र अनेक ग्रंथपालांना दिलासा देणारे आहे. सर्वोत्तम बाबी (The best) कमी असतात. त्यामुळे त्या थोड्या ठिकाणीच उपलब्ध होऊ शकतात. सर्वत्र अपेक्षा असते ती चांगल्या वस्तूची (The good). पण सर्वोत्तमच्या मागे लागल्यामुळे साधे चांगले काम देणेही घडत नाही. त्याचबरोबर चांगल्याची कदरच होत नाही. सात तास उत्तम ग्रंथालय सेवा देण्याऱ्याची अवहेलना चोवीस तास ग्रंथालय सेवा देणाऱ्या ग्रंथालयाचे उत्तम उदाहरण देऊन केली जाते. वातानुकूलित वाचनकक्ष देण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेपोटी वाचकांना साधा हवेशीर कक्ष देणेही राहून जाते. 'उत्तम' ग्रंथपालाच्या शोधामध्ये किमान ग्रंथालय सेवा देऊ शकणाऱ्या ग्रंथालयातीलच उत्तम नसलेल्या पण सक्षम कर्मचाऱ्याकडे दुर्लक्ष होऊन वर्षानुवर्षे ग्रंथालये निर्नायकी ठेवण्याचे प्रकार तर जागोजागी आढळतात. याचा अर्थ उत्तम नको असा नव्हे तर उत्तमाच्या नादी लागून मूळ कार्याचा नाश होणार नाही याची काळजी घ्यावी. चांगल्या (Good) ची परिणती अधिक चांगल्या (Better) मध्ये करीत, मग उत्तम (The best) मिळवावे हा मार्ग अर्कहार्टना सुचवावयाचा असावा, असे वाटते.

**सूत्र ११वे –** 'Unit Cost for particular activity should decrease as the magnitude of the activity increase.' 'एखादे कार्य जसजसे वाढत जाते तसतसा त्याच्या घटकावर होणाऱ्या खर्चाच्या प्रतिघटक खर्चात बचत झाली पाहिजे.' व्यवस्थापनाच्या दृष्टीने अत्यंत आदर्श असे हे सूत्र आहे. प्रतिघटक खर्च ही ग्रंथालय व्यवस्थापनासंदर्भात एक उपयुक्त संकल्पना अर्कहार्ट यांनी मांडली आहे. ग्रंथालय सेवा ही खर्चाचीच बाब आहे. त्यात मिळकत नाही हे सत्य पारंपरिकरित्या मान्य केलेले असले तरी खर्चासंदर्भात ग्रंथालयांनी काटेकोर राहिले पाहिजे. खर्चावर नियंत्रण ठेवले पाहिजे. हे नियंत्रण ठेवण्याचा मार्ग म्हणजे ग्रंथालयातील कोणत्याही कार्यक्रमावर खर्च नोंदविला पाहिजे व त्यातील संबंधित घटकावर तसेच लाभार्थींच्या प्रतिभागावर तो किती होतो, हे पाहिले पाहिजे. त्यानुसार पुढे हा कार्यक्रम जसाजसा विस्तारित होईल तसा हा प्रतिघटक खर्च कसा कमी होईल, हे पाहिले पाहिजे. व्यवस्थापनाच्या नियमानुसार कार्यक्रम जेव्हा लहान असतो तेव्हा त्यावर खर्च होणारी रक्कम प्रतिघटक जास्त असते, कारण काही खर्च हे पायाभूत व म्हणून अपरिहार्य



असतात. पण पुढे होणारा खर्च या सर्व घटकावर वाटला जात असल्याने प्रतिघटक खर्च कमी होतो. उदाहरणार्थ, एखाद्या पुस्तकाच्या छपाईस येणाऱ्या खर्चात पहिल्या प्रतीच्या १,००० आवृत्तीत, प्रत्येक प्रतीवरचा खर्च जास्त असेल पण पुढे आणखी १,००० प्रती काढावयाच्या ठरविल्यास त्या प्रतींवरील प्रती प्रत खर्च पहिल्या प्रती प्रत खर्चापेक्षा कमीच असतो. कारण त्या आवृत्तीस खिळेजुळणी, कव्हरवरचे डिझाइन, पहिला व्यवस्थापकीय खर्च असणार नाही. ग्रंथालयीन सेवांमध्ये असेच झाले पाहिजे. नियतकालिक विभागात एका वर्षामध्ये नियतकालिकांचे ५,००० अंक येत असतील तर त्यांच्या नोंदणीपासून बांधणीपर्यंतचा प्रति अंक खर्च, हा अधिक नियतकालिके घ्यावयाची ठरल्यास येणाऱ्या अंकांच्यावर होणाऱ्या व्यवस्थापकीय खर्चापेक्षा जास्त असला पाहिजे. जास्त अंकावरील खर्च कमी झाला पाहिजे. व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेचे मोजमाप अर्कहार्टनी दाखविले आहे.

**सूत्र १२ वे –** 'No Library is an Island.' ग्रंथालय म्हणजे एक बेट नव्हे! (जे चारही बाजूने पाण्यामुळे समूहापासून तुटले आहे). कोणतेही ग्रंथालय परिपूर्ण असूच शकत नाही, त्यासाठी त्याला इतर ग्रंथालयांवर अवलंबून राहावेच लागते. हा सिध्दांत ग्रंथालयामधील परस्पर सहकार्याची अपरिहार्यता जशी दर्शवतो तशीच ग्रंथपालांमधील आपापसात आवश्यक असलेल्या संपर्काकडे आपले लक्ष वेधून घेतो. आपल्या ग्रंथालयात सर्वच मिळाले पाहिजे अशी ग्रंथपालापासून संचालकांपर्यंत सर्वांचीच इच्छा असते आणि त्या दृष्टीने धडपड चालू असते. मग या प्रकारात 'बेस्ट इज एनिमी ऑफ गुड' या सूत्रानुसार किमान गरजा पुरवणारे ग्रंथालय तरी बनणे राहूनच जाते, याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे, हा या सूत्राचा रोख आहे. यात ग्रंथालय संघटनांचा लपलेला संकेत ग्रंथपालांनी ध्यानात घ्यावा.

**सूत्र १३वे –** 'Objective Data about users' requirements should be used in planning development of libraries.' ग्रंथालयाच्या विकासाचे नियोजन करताना वाचकांच्या गरजांबद्दलची वस्तुनिष्ठ माहिती वापरली पाहिजे. ग्रंथालयाची वाढ, प्रगती करण्याच्या मागे लागलेला अतिउत्साही ग्रंथपाल, त्याचे अधिकारी यांना वस्तुस्थितीची जाणीव करून देणारे हे सूत्र आहे. ग्रंथालये वापरासाठी असतात. ती वापरली गेली नाहीत तर काहीच अर्थ नाही, हे मूलभूत सूत्र या सूत्राच्या मागे आहे. ग्रंथालये वर्धिष्णू असतात हा ग्रंथपालनाचा रंगनाथनप्रणीत सिध्दांत खरा असला तरी ही वाढ नियोजित असली पाहिजे आणि त्या नियोजनाचा आधार वाचकांच्या गरजा हा असला पाहिजे. या सूत्रातील वस्तुनिष्ठ (Objective) या शब्दाकडे विशेष लक्ष वेधणे आवश्यक आहे. त्यात दोन बाबी संबंधित आहेत. एक म्हणजे माहिती गोळा केली पाहिजे व दुसरे म्हणजे ती वस्तुनिष्ठपणे गोळा केली पाहिजे.

तशी न केल्यास चुकीच्या मार्गाने ग्रंथालयाची वाढ होईल व वाचक असंतुष्ट राहतील.

**सूत्र १४वे –** 'In Considering the use of new techniques and systems, it is necessary to look at the future and not the past.' नवीन तंत्रज्ञान व पध्दतींचा वापर करताना भविष्याकडे लक्ष ठेवावे. भूतकाळाकडे नव्हे. सदैव बदलाचा हव्यास असणाऱ्या आपल्या समाजास सतत बदलणारे तंत्रज्ञान नेहमीच हाताशी असते. सतत विकसित होणाऱ्या विचारप्रणालीही उपलब्ध असतात. पण त्यांच्या उपयोगाबाबत एक व्यवधान बाळगणे गरजेचे असते. सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानात आजचे तंत्रज्ञान त्वरित कालबाह्य होण्याचा धोका असतो. तसेच आज गोड वाटणारी विचारधारा कालौघात टिकून राहीलच असे नाही. कदाचित ती अनिष्टही ठरेल. गेल्या दशकातील तंत्रज्ञानाची प्रगती तर भल्याभल्यांना चक्रावणारी आहे. आजही तिच्या भविष्याचा वेध घेणे जवळ जवळ अशक्य झाले आहे. तीच बाब विचारप्रणालींचीही. सरकारचे कर्तव्य मानले जाणाऱ्या शिक्षणक्षेत्रातील एक-एक बाब सरकार झटकून टाकीत आहे. कामगारांच्या हितरक्षणाची शपथ घेणारा समाज आज कामगार संघटनांचा प्रभाव कमी कसा होईल ते पाहत आहे. तरीही नवे विचार, नवी तंत्रज्ञाने घेताना इतपत भान ठेवले पाहिजे की आज जे अत्यंत प्रगत वाटत आहे ते घ्यावे. कारण उद्या तेही मागासलेले होणार असले तरी तोपर्यंत तुम्हांस उसंत मिळेल. विचाराच्या बाबतीत एवढे ध्यानात ठेवावे की, मूलभूत तत्त्वे कधीच नष्ट होत नाहीत. ती शाश्वतच असतात. जे विचार या सिध्दांताच्या बाजूने जातात तेच अंगीकारावे, उगाचच आकर्षक वाटले म्हणून 'क्रांतिकारक' विचारांच्या मागे लागू नये. १९८० च्या काळात सीडीरॉम येताक्षणीच एका ग्रंथपालाने ग्रंथालयात रिकाम्या झालेल्या सेवकाची पदे भरण्याचे नाकारले. परिणामी अफाट खर्चामुळे पुरेसे सीडीरॉमही विकत घेता येईनात व मान्य झालेल्या सेवकांच्या जागा न भरल्यामुळे रद्द झाल्या व ग्रंथालय सेवा खालावली. शिवाय सीडीरॉमचे तंत्रज्ञान विकसित होत गेले व त्याला अनुलक्षून आवश्यक असलेली संगणक यंत्रणा पुरेशी उभी करता येईना. अशा पेचाचे बळी न ठरण्याच्या दृष्टीने अर्कहार्टचे हे सूत्र उपयुक्त वाटेल.

**सूत्र १५वे –** 'Staff of the library should work as a team.' ग्रंथालयातील सर्व सेवकांनी संघप्रवृत्तीने काम केले पाहिजे. तंत्रज्ञानाच्या कार्यपद्धतीवर होत असलेल्या परिणामाच्या संदर्भात हे सूत्र आज अर्कहार्टच्या काळापेक्षा जास्त महत्त्वाचे ठरत आहे. व्यवस्थापनशास्त्रातील नवनवीन विचारप्रवाहांच्या ओघातही ते मार्गदर्शक ठरणार आहे. ग्रंथालयसेवा हा अनेक घटकांच्या एकात्म परिणामाचे फलित आहे. एखाद्या संदर्भप्रश्नाचे त्वरित उत्तर दिले गेले हे जितके संदर्भग्रंथपालास भूषणावह आहे तितकेच ते वेळेवर संदर्भग्रंथाची नवी आवृत्ती विकत घेण्याचा निर्णय घेणाऱ्या



प्रमुख ग्रंथपालास आहे आणि निर्णयाची अंमलबजावणी करून संदर्भग्रंथ संदर्भ विभागात पोहोचता करण्यास जबाबदार असलेल्या उपार्जन, संस्करण विभागासही आहे. ग्रंथालयातील सर्व काम अशाच स्वरूपाचे एकात्मक काम आहे. कामाचे वाटप हे केवळ सोयीसाठी असते. त्यातील अदलाबदल केव्हाही आवश्यक व शक्य असतात. एरव्हीच्या व्यवस्थापनात उच्च-नीच असे स्तर व प्रत्येक स्तरावरील विभाजन, शिवाय कामाची कौशल्याधारित विभागणी ही तत्त्वे यशस्वीपणासाठी आवश्यक असतात. पण ग्रंथालय व्यवस्थापनात व्यवहाराकरिता ती आवश्यक असली तरी प्रत्यक्षात एकमेकांत गुंफलेली असतात. वाचकांचीही तशीच धारणा असते. सामान्य वाचकांसाठी ग्रंथपाल म्हणजे देवघेवीच्या विभागात ग्रंथ देणारा व घेणारा सेवक असे जे वर्णन केले जाते त्यात खूपच तथ्य आहे. यासाठी ग्रंथालयात काम करणाऱ्यांनी एक भान ठेवले पाहिजे, की ते एका संघाचे घटक आहेत. क्रिकेट खेळामधील गोलंदाजाचा जसा क्षेत्ररक्षकाशी संबंध असतो असेच ग्रंथालय व्यवस्थापनाचे आहे. संघाला कप्तान हवा म्हणून ग्रंथालयात ग्रंथपाल, अन्यथा सर्व समान महत्त्वाचे खेळगडी. अयशस्वी गणल्या जाणाऱ्या ग्रंथालयाचे दुखणे नेमके हे असते. (आणि अर्थातच उलट अर्थाने, यशस्वी ग्रंथालयाच्या यशाची गुरूकिल्लीही आहे, हेही सांगावयास नकोच.) ग्रंथालयसेवकांनी कळीचे म्हणून मानावयास पाहिजे हे सूत्र.

**सूत्र १६वे –** 'Librarian post is not a sinecure for a scholar - a librarian's task is often to facilitate the work of many scholars.' 'ग्रंथपालाचे पद म्हणजे भरपूर पगार घेऊन कोणतेही उत्तरदायित्व न मानणारे विद्वानास प्रदान केलेले पद नव्हे तर अनेक विद्वानांना त्यांचे काम सुकर आणि सुलभ करण्याचे काम करण्यासाठी ग्रंथपाल पद आहे.' अर्कहार्टचे हे सूत्र अनेक ग्रंथपालांना पाठीवर कोरडा ओढण्याजोगे वाटण्याची शक्यता आहे. अनेक वर्षांच्या सेवेनंतर ग्रंथपालपद मिळाले की गंगेत घोडे न्हाल्याचे समाधान पावून सुखाने कालक्रमण करण्याची वृत्ती जोपासणाऱ्या ग्रंथपालांच्या पाठीवर खरोखरच हा कोरडा आहे. ग्रंथपाल हा विद्वान असावा; नव्हे, तो असतोच. पण विद्वानापेक्षा वेगळे असे त्याचे व्यवच्छेदक लक्षण कोणते ते अर्कहार्ट यांनी या सूत्राद्वारे नेमके मांडले आहे. विद्वानास लठ्ठ पगार मिळतो पण विद्वानांच्या कामाचे स्वरूप हे कालबध्द उत्तरदायित्व देता येईल, असे नसते. त्याच्या फलिताच्या क्षणापर्यंत अनेक अपयशी प्रयत्न पण येऊ शकतात व अंतिम फलित बऱ्याच काळानंतर मिळते. ग्रंथपालाचे तसे नाही. त्याच्या दैनंदिन कामामध्ये विद्वानांच्या कार्यात मदत करणे, त्यांचे कार्य सुकर करणे यासाठी सतत करीत असलेल्या कार्याचा अंतर्भाव असतो व तेच त्याचे उत्तरदायित्व असते. त्याचा मागोवा अगदी दैनंदिनही घेता येऊ शकतो. त्याच दृष्टीने ग्रंथपालाने कार्यरत असले पाहिजे. हा

या सूत्राचा रोख आहे. ग्रंथपालपद हे या दृष्टीने राबविले पाहिजे असा संदेश हे सूत्र देते.

**सूत्र १७वे –** 'Libraries can be valuable to the society.' 'ग्रंथालये ही समाजासाठी मोलाचे योगदान देणारी संस्था बनू शकते.' हे (व पुढील अठरावे सूत्र) ग्रंथपालन व्यवसायाचे अंतिम उद्दिष्ट मांडते. या सूत्राचा संदेश हा अत्यंत आशादायी, ग्रंथपालास कार्यप्रवृत्त करणारा, दैनंदिन कामाबद्दल समाधान देणारा, उद्याच्या कामाची आतुरतेने वाट पहावयास लावून सतत उत्तम काम करण्यास उद्युक्त करणारा संदेश आहे. तात्त्विकदृष्ट्या ग्रंथालयाचे समाजातील स्थान सर्वांनीच मान्य केले आहे. या विषयावर तोंडाने भरभरून बोलले जाते, व्यासपीठावरून वक्तव्य करून टाळ्या मिळविल्या जातात, पुस्तकांची पाने, नियतकालिकांचे लेख, वृत्तपत्रांचे रकाने भरले जातात, पण प्रत्यक्ष कामाचे महत्त्व व कामाची दिशा अर्कहार्ट 'Can be' या शब्दप्रयोगाने अधोरेखित करतात. ग्रंथालय उपयुक्त करणे शक्य असते असे ते जेव्हा म्हणतात तेव्हा त्यांना सुचवायचे आहे, की ग्रंथपाल आपल्या कामानेच ते करू शकतात, त्यांनी काम केले नाही तर ते होऊ शकत नाही हा महत्त्वाचा मुद्दा आहे. ग्रंथपालांनी ग्रंथालय सातत्याने नीट साकारले पाहिजे, त्याचे नीट व्यवस्थापन केले पाहिजे, त्यांच्या कार्यास निश्चित दिशा असली पाहिजे व त्या दिशेने त्यांनी वाटचाल केलेली दिसली पाहिजे एवढा सगळा अर्थ 'Can be' या शब्दयोजनेत आहे, हे ध्यानात ठेवावयास हवे. नाही तर ग्रंथालये आपली चालताहेत, वाचक वाचताहेत, कधीतरी कुरबुर करताहेत, मग गप्प बसताहेत, ग्रंथपाल कोलांट्याउड्या मारून नि अनंत सबबी सांगून आपल्या कामाचे (खरे तर निष्क्रियतेचे) समर्थन करताहेत. असे बऱ्याच ठिकाणी दिसणारे चित्र बदलावयास पाहिजे, हा संदेश हे सूत्र देत आहे. काम केले तर नक्की समाधान देईल, एक दिवस, दोन दिवस नव्हे तर नियुक्तीपासून निवृत्तीपर्यंत (आणि निवृत्तीनंतरही सुखद आठवणींच्या स्वरूपात) समाधान देणारा हा व्यवसाय आहे असे आश्वासन अर्कहार्ट ग्रंथपालांना देत आहे. हे त्याचे व्यवसायावर उपकारच आहेत.

**सूत्र १८वे –** 'Librarianship is an experimental Science' ग्रंथपालन हे प्रायोगिक शास्त्र आहे. त्यांचे ग्रंथपालन हे शास्त्र आहे की नाही हा वाद सुरुवातीपासूनच चालू आहे व तो चालू राहणार आहे. लायब्ररी सायन्स या संकल्पनेला जगभर मान्यता मिळाली असली तरी ते सायन्स आहे, हे सिध्द करण्यासाठी खुद्द ग्रंथपालनाद्वारे आटापिटाच करावा लागतो. अर्कहार्ट यांनी यावर उत्तम व योग्य भाष्य या सूत्राद्वारे केले आहे. वर म्हटल्याप्रमाणे त्याद्वारे त्यांनी ग्रंथपालांना कार्यसातत्याचा संदेशही दिला आहे. ग्रंथालयशास्त्र हे व्यवसायाभिमुख (Practising) शास्त्र आहे. प्रशिक्षणकाळात शिकलेली तत्त्वे प्रत्यक्ष कामाच्या वेळी उपयोजित करून त्यात



अधिकाधिक प्रगल्भता आणणे हा या शास्त्राचा पाया आहे. या दृष्टीने त्याचे कायद्याच्या व वैद्यकीय ज्ञानाशी बरेच साधर्म्य आहे. पण या उपयोजनांमध्ये अत्यंत महत्त्वाची बाब कोणती असेल तर प्रयोगांची. सिध्दांताचे उपयोजन करताना ते यशस्वी, फलदायी व्हावे म्हणून प्रयोगांची आवश्यकता असते, ही बाब ग्रंथालयशास्त्रात आवश्यक आहे. जसजसे हे प्रयोग होत जातील, यशस्वी होत जातील तसतसा ग्रंथालयशास्त्राचा विकास होणार आहे. अर्कहार्टनी मांडलेला हा सिध्दांत आज पस्तीस वर्षांच्या काळानंतर खराही ठरला आहे. ग्रंथालयशास्त्रातील कितीतरी नवीन गोष्टी प्रयोगाअंतीच ग्रंथालयशास्त्राचे अंग झाल्या आहेत. माहितीशास्त्राचा उदय, माहितीसाठ्याच्या पध्दती, माहितीची साठवण, माहितीची प्रतिप्राप्ती यासारख्याच बाबी नव्हे तर ग्रंथालय संगणकीकरणासंबंधित डिजिटल, व्हर्च्युअल लायब्ररी या संकल्पना, इंटरनेटच्या संदर्भसेवेसाठी उपयोग, सीडीरॉमची माहिती साठवण्यासाठी उपयोग अशा कित्येक बाबी प्रयोगाअंतीच या शास्त्रात आल्या. व्यवस्थापनातही रिसोर्स शेअरिंग, कन्सॉर्शिअम, व्यवस्थापनशास्त्राचा ग्रंथालय व्यवस्थापनात उपयोग एवढेच नव्हे तर भारतातील राज्या-राज्यातील ग्रंथालय कायद्यांचे वेगवेगळे स्वरूप हेदेखील प्रयोगांचे फलित आहे. म्हणून ग्रंथपालांनी सतत प्रयोगशील राहिले पाहिजे व त्याद्वारे नवनवीन कार्यात मग्न राहिले पाहिजे, असा संदेश या सूत्राद्वारे त्यांनी दिला आहे.

## समारोप

अर्कहार्ट यांच्या अठरा सूत्रांचा एकत्रित परामर्श घेताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, त्यांचा ग्रंथालय या संस्थेवर जबरदस्त विश्वास आहे व तो इतर ग्रंथपालांमध्येही निर्माण करण्याचा ते प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. डॉ. रंगनाथन यांची पंचसूत्री व या अठरा सूत्रीत बरेच साधर्म्य आहे. दोन्ही ग्रंथपालन व्यवसायास मार्गदर्शक असल्या तरी त्यात काही फरकही आहे. हा तौलनिक अभ्यास हा वेगळ्या लेखाचा विषय होऊ शकेल; तसेच अर्कहार्ट यांनी ही सूत्रे मांडताना कायदे (Laws), सिध्दांत (Principales), सूत्रे (Guidelines), इत्यादींबाबत केलेली तात्त्विक चर्चा व त्यानुसार या सूत्रांचे केलेले वर्गीकरण हाही एक वेगळ्या लेखाचा विषय होईल. प्रस्तुत लेख अर्कहार्टच्या सूत्रांचा परिचय करून घेऊन ग्रंथपालास विचारास प्रवृत्त करावे, या हेतूपुरताच मर्यादित आहे. तो साध्य झाला असावा असे लेखिकेस वाटते.

# ग्रंथालयशास्त्राची तात्त्विक बैठक (भाग-१)

*-प्रा. म. रा. रिसवडकर*
निवृत्त प्राध्यापक,
सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे

*या आधीच्या दोन लेखांमध्ये अर्कहार्टच्या सूत्रांचा परिचय करून घेतला. रंगनाथनप्रणीत पंचसूत्री आपणा सर्वांस अगदी सुपरिचित आहे. या आणि आणखी काही सूत्रांचा आशय नव्याने सांगणारा हा लेख.*

कोणत्याही शास्त्राच्या विकासाचा अभ्यास हा वेळोवेळी त्या शास्त्रातील तज्ज्ञांनी मांडलेल्या तत्त्वांचा अभ्यास असतो.प्रस्तुत लेखात १८७६ ते १९८१ ह्या १०५ वर्षांत ग्रंथालय व्यवस्थापनाविषयी जी अनेक तत्त्वे मांडली गेली, त्यापैकी काहींचा विचार केला आहे. प्रथम १८७६ आणि १९८१ या दोन वर्षांचा आरंभ आणि शेवट म्हणून निवड का केली हे विशद करणे आवश्यक आहे. मेलव्हिल ड्यूई यांनी १८७६ मध्ये अमेरिकन लायब्ररी असोसिएशनच्या स्थापनेप्रसंगी सर्व ग्रंथपालांना परिचित असलेल्या 'जास्तीतजास्त वाचकांसाठी कमीतकमी खर्चात जास्तीतजास्त पुस्तके' या तत्त्वाचा पुरस्कार केला. डॉनल्ड अर्कहार्ट यांचे ''प्रिन्सिपल्स ऑफ लायब्रेरियनशिप'' हे पुस्तक १९८१ मध्ये प्रकाशित झाले. या दोन घटनांच्या मध्यावर प्रकाशित झालेल्या आणखी एका पुस्तकाचा विचार करणे भाग आहे. ते आहे एस. आर. रंगनाथन यांचे ''फाईव्ह लॉज ऑफ लायब्ररी सायन्स'' हे. अशा प्रकारे १८७६ ते १९८१ या काळातील घडलेल्या या तीन प्रमुख घटना ग्रंथालयशास्त्र हे ग्रंथालय व्यवस्थापनशास्त्र आहे हे मुख्यत्वेकरून विशद करतात.

वरील ड्यूई यांचे कमीतकमी खर्चात जास्तीत जास्त पुस्तके हे तत्त्व वरवर पाहता. ती अगदी साधी आणि उघड (Obvious) गोष्ट आहे, असे कोणालाही वाटेल. पण एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पर्वात आजच्या ग्रंथपालांना परिचित असलेल्या बेस्ट सेलर्स आणि पेपरबॅक्स यांचा सुकाळ नव्हता. तरी जास्तीतजास्त नावाजलेली पुस्तके असाच त्याचा अर्थ त्या काळाला अनुरूप असा करणे योग्य होईल. त्याप्रमाणे कमीतकमी खर्च याचा अर्थ कमी किंमत असा नसून ग्रंथ संपादन, संघटन आणि सेवा यांवरील एकूण खर्च संपादन केलेल्या ग्रंथांच्या परिणामकारकतेच्या प्रमाणात असणे आवश्यक आहे, हे इथे प्रतिपादित होते. थोडक्यात, आजच्या ग्रंथालय व्यवस्थापनात उपयोजित होत असलेल्या व्यवस्थापनशास्त्रातील खर्चाच्या प्रमाणात



उपयुक्तता किंवा परिणामकारकता (Cost-effectiveness) ही संकल्पना ड्यूई यांच्यावरील तत्त्वात अभिप्रेत आहे, असे म्हणणे रास्त होईल.

रंगनाथन यांची ग्रंथालयशास्त्राची पाच सूत्रे ग्रंथपालांना सुपरिचित आहेत. या पाच सूत्रांपैकी फक्त पाचव्या सूत्राचा इथे विचार करायचा आहे. कारण त्याचे स्वरूप सिद्धांतसदृश आहे. पहिली चार सूत्रे ही नैतिक मूल्ये आहेत आणि त्यांच्या पालनात व्यक्तिनिष्ठतेचा प्रभाव जाणवू शकतो. याउलट पाचवे सूत्र हे परिपूर्णपणे वस्तुनिष्ठतेवर आधारित आहे आणि म्हणून त्याचा तत्त्व किंवा सिद्धांत म्हणून विचार होऊ शकतो. रंगनाथन यांच्या या तत्त्वाचा आशय असा आहे की ग्रंथालयाच्या स्वरूपात सतत बदल घडत असतो. रंगनाथन यांच्या मनाप्रमाणे ग्रंथालयाचे स्वरूप जैविक आहे आणि म्हणून ग्रंथालय हे सतत वृद्धिंगत असते. हे स्वरूप जैविक असल्याने या सतत होणाऱ्या ग्रंथालयाच्या वृद्धीमध्ये प्राकृतिक वाढीखेरीज निसर्गाच्या नियमांप्रमाणे घडणारे इतर बदलही अभिप्रेत आहेत.

सतत वाढणारा ग्रंथसंग्रह आणि त्याच्या पद्धतशील मांडणीसाठी आणि तालिकेसाठी आवश्यक असलेली वाढती जागा ह्या गोष्टी ग्रंथालयांची प्राकृतिक वाढ दर्शवितात. रंगनाथन यांच्या पाचव्या तत्त्वातील वृद्धी या शब्दाचा अर्थ इतक्या मर्यादित स्वरुपात घेतल्यास ब्रिटनमधील १९७५ च्या अँट्‌किन्सन अहवालातील नियंत्रित प्राकृतिक वाढ (इंग्रजीमध्ये झिरो ग्रोथ किंवा सेल्फ रिन्युईंग लायब्ररी) या जागतिक स्तरावर स्वीकार झालेल्या संकल्पनेशी हे तत्त्व विसंगत ठरेल. तरी पाचव्या तत्त्वातील वृद्धिंगत या शब्दाचा अर्थ प्रगत असाच घेणे योग्य ठरते. ग्रंथालयाची वृद्धी ही सतत होतच असते. पण या वृद्धीचे स्वरूप परंपरागत न राहता इतर शास्त्रांत आणि तंत्रज्ञानात होणाऱ्या प्रगतीनुसार सतत बदलते. उदाहरणार्थ, ग्रंथसंख्या वाढती राहील, पण छापील ग्रंथांच्या ऐवजी (CD's) असतील, लांबलचक सार्वजनिक तालिकेच्या ठिकाणी ओपॅकची सुटसुटीत सुविधा उपलब्ध होईल आणि वाचकांची संख्या वाढली तरी वाचनकक्षाच्या सीमा वाढविण्याची गरज भासणार नाही. बरेचसे वाचक आपापल्या कामाच्या ठिकाणांहून संगणकाद्वारे ग्रंथसंग्रहकाशी संपर्क साधू शकतील आणि बसल्या जागी ग्रंथालयीन सेवांचा लाभ घेऊ शकतील.

एकदा ग्रंथालय हे सतत वृद्धिंगत असते या रंगनाथन यांच्या सिद्धांताचा स्वीकार केला की त्या सिद्धांताच्या दुसऱ्या बाजूचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. ज्या क्षणी ग्रंथालयाची वृद्धी होणे थांबेल त्या क्षणी त्याचे स्वरूप जैविक असल्याने त्याचा ऱ्हास (Decay) होऊ लागेल. तरी ग्रंथपालांना याची सतत जाणीव ठेवावी लागेल व त्या दृष्टीने व्यवस्थापनात वेळोवेळी आवश्यक ते बदल करावे लागतील आणि म्हणूनच अर्कहार्ट यांच्या ग्रंथालय व्यवस्थापनाच्या अठरा तत्त्वापैकी एक आहे, 'Librarianship is an Experimental Science'.

वर डॉनल्ड अर्कहार्ट यांच्या १९८१ साली प्रकाशित झालेल्या ग्रंथालय व्यवस्थापनाची तत्त्वे या पुस्तकाचा उल्लेख आलेला आहे. अर्कहार्ट यांनी एकूण अठरा तत्त्वे विशद केली आहेत. या ठिकाणी त्यांपैकी फक्त तीन तत्त्वांचा विचार करायचा आहे. ही तीन तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत :

(१) पुरवठा मागणी निर्माण करतो.
(Supply Creates Demands)

(२) ग्रंथालयीन सेवा ही मोफत देता येत नाही.
(Libraries have to be paid for)

(३) सेवा आणि साधने चांगली असावीत, ती उत्तम असण्याची आवश्यकता नाही.
(The best is the enemy of the good)

अर्कहार्ट यांचे 'पुरवठा मागणी निर्माण करतो' हे तत्त्व अर्थशास्त्रातील 'मागणी तसा पुरवठा' या तत्त्वाशी काहीसा विरोधाभास दर्शविते. पण लेखकाचा उद्देश विरोधाभास दर्शविणे हा नसून अर्कहार्ट यांच्या या तत्त्वाचा आशय असा आहे की ग्रंथपालाने विविध सेवांव्दारे वाचकांना ग्रंथ किंवा प्रलेख यांच्या मागणीसाठी उद्युक्त करावे. प्रत्येक ग्रंथपाल आपल्या परीने हे करतच असतो. उदाहरणार्थ, ग्रंथालय पुरवीत असलेल्या विविध माहिती प्रसारण सेवा. ब्रिटनच्या लायब्ररी असोसिएशनने अनेक ग्रंथालयीन गोष्टीविषयी पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत. त्यांपैकी एका पुस्तिकेतील पहिलेच वाक्य आहे, 'Display is dissemination'. हे वाक्य जितके नादमधुर तितकेच अर्थपूर्ण आहे. नवीन आलेले ग्रंथ आणि नियतकालिके वाचकांच्या सहजगत्या नजरेस पडतील अशा रितीनेच ग्रंथालयात प्रदर्शित केलेली असतात. वाचकांनी मागणी करावी म्हणून एका प्रकारे यामार्गे ग्रंथालय वाचकांना आवाहन करीत असते. पण 'डिस्प्ले' ही झाली माहिती प्रसारण सेवांच्या सुरुवात आणि या सर्वसाधारण सेवेपासून ते एस.डी.आय.पर्यंत इतर अनेक सेवांच्या मार्गे ग्रंथालय ग्रंथालयात उपलब्ध होत असलेल्या ज्ञानसाधनांविषयी सतत माहिती पुरवून वाचकांना मागणी करण्यासाठी उद्युक्त करीत असते. तरी अर्कहार्ट यांचे हे तत्त्व माहिती प्रसारण सेवा आणि ग्रंथालयांचा वाढता उपयोग किंवा ग्रंथालयीन विपणन व्यवस्थापनाच्या संदर्भात ग्रंथपालांसाठी अत्यंत मार्गदर्शक आहे.

'ग्रंथालयीन सेवा ही मोफत देता येत नाही' हे तत्त्व आता सार्वजनिक ग्रंथालयांसकट सर्व ग्रंथालयांच्या संदर्भात मान्य झाले आहे. सार्वजनिक ग्रंथालयांच्या बाबतीत सर्वसाधारण लोकांचा आणि बहुसंख्य ग्रंथपालांचा असा समज आहे, की ही सेवा मोफत पुरविली जाते. जरी सार्वजनिक सेवांचा लाभ देणाऱ्या लोकांना त्या सेवा



मोफत मिळत असल्या तरी त्यांची उभारणी आणि व्यवस्थापन याचा खर्च करदात्यांनी सोसलेला असतो. तरी ग्रंथालयीन सेवा ही मोफत मिळत नसते; काही वाचक कदाचित अप्रत्यक्ष आणि करदाते प्रत्यक्षपणे त्याकरता पैसे मोजत असतात. क्रय-विक्रय होणाऱ्या इतर वस्तूंप्रमाणेच ज्ञान आणि माहिती या वस्तू आहेत, ही संकल्पना आता सर्वमान्य झाली असल्याने वरील तत्त्वांचा आता सर्व ग्रंथपालांनी नि:संकोचपणे स्वीकार करणे योग्य आहे.

महाविद्यालयीन आणि विद्यापीठ ग्रंथालयांच्या संदर्भात वरील तत्त्वांची सत्यता प्रकर्षाने जाणवते. महाविद्यालय आणि विद्यापीठ या दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून ग्रंथालय शुल्क घेण्यात येते. अर्थात हे शुल्क एकूण ग्रंथालयावर होणाऱ्या खर्चाच्या मानाने नगण्य आहे. पण त्यामुळे या तत्त्वाला बाधा येत नाही. सर्वात श्रीमंत असलेल्या अमेरिकेत तेथील विद्यापीठे त्यांच्या एकूण खर्चापैकी ३ ते ४ टक्के खर्च ग्रंथालयावर करतात. हे प्रमाण ६ ते १० टक्के असावे, अशी मागणी बरेच ग्रंथपाल विशेषत: भारतातील – नेहमी करत असतात. आर्थिक दृष्ट्या ही मागणी अवास्तव असून कोणत्याही देशातील राज्यकर्त्यांना ती पूर्ण करता येणार नाही. तरी आता या ग्रंथालयांनी शुल्क आकारून नवनवीन सेवा पुरवाव्यात आणि त्या मार्गे आपले उत्पन्न वाढवावे, असा मतप्रवाह जागतिक स्तरावर मान्य होत आहे. या मतप्रवाहाच्या पुष्ट्यर्थ पुढील दोन संदर्भ उदाहरणादाखल पुरेसे आहेत.

लायब्ररी क्वार्टर्लीमध्ये १९८० साली डॉन स्वॉन्सन (त्यावेळी शिकागो विद्यापीठात ग्रंथालयशास्त्र विभागाचे प्रमुख होते) यांनी देशाचे माहितीविषयक धोरण याविषयी लेख लिहिला. (Evolution, Libraries and National Information Policy, pp.76-93.)

या त्यांच्या लेखात ग्रंथालयांनी विशेष सेवा पुरविण्यासाठी उदाहरणार्थ, ऑनलाईन ॲक्सेस शुल्क आकारावे असे त्यांनी सुचविले आहे. आपल्या या सूचनेला आधार म्हणून या संबंधातील पिटर वॉटसन या अर्थतज्ज्ञांचे विचार उद्युक्त केले आहेत. वॉटसन यांच्या मते, कोणत्याही सेवेबद्दल शुल्क आकारणे हे नैतिक दृष्ट्या मुळीच चूक नाही, राजकीय दृष्ट्या वेडेपणाचे नाही किंवा शैक्षणिक आणि आर्थिक दृष्ट्या नुकसानकारक नाही. या ठिकाणी आणखी एका गोष्टीचा उल्लेख जरूर करता येईल. मेडलर्स ही सरकारी माहिती सेवा आणि ओ.सी.एल.सी. ही सार्वजनिक क्षेत्रातील माहिती सेवा या दोन्ही सेवा ग्रंथालयांसकट सर्व उपभोक्त्यांना विकत घ्याव्या लागतात. भारतातसुद्धा राजस्थान विद्यापीठ ग्रंथालय प्रकाशित करीत असलेले इन्डेक्स इंडिया आणि इन्सडॉकचे इंडियन सायन्स ॲब्स्ट्रॅक्टस् या दोन माहितीसेवा वर्गणी भरल्याशिवाय कोणत्याही ग्रंथालयाला उपलब्ध होत नाहीत.

उत्पन्न वाढविण्याचे ग्रंथालयांना उपलब्ध असलेले विविध मार्ग यासंबंधी निगेल मॅकट्र्नी यांचा लेख १९९० मध्ये लायब्ररी असोसिएशनने प्रकाशित केलेल्या आणि मॉरिस लाईन संपादित अ‍ॅकॅडमिक लायब्ररी मॅनेजमेंट या लेखसंग्रहात समाविष्ट आहेत. (Revenue Earning and Cost Recovery, pp.223 -231) या लेखात मॅकट्र्नी यांनी एकूण पस्तीस विशेष सेवांची यादी दिलेली आहे. शुल्क आकारून या सेवा पुरविल्यास ग्रंथालयांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते, असे त्यांचे मत आहे. भारतातील ग्रंथपाल या सर्व नाही; पण यापैकी पाच-सहा सेवा खास देऊ शकतील. यापैकी फोटोकॉपिंग ही सेवा आज काही विद्यापीठ ग्रंथालये देत आहेतच.

वरील चर्चेच्या आधारे अर्कहार्ट यांचे ग्रंथालयीन सेवा मोफत देता येत नाहीत हे तत्त्व आता सर्वमान्य झाले आहे, हे पटण्यास हरकत नाही. तसेच या तत्त्वात (Information is a commodity) ही संकल्पना अभिप्रेत आहे, हे पण लक्षात येईल.

प्रस्तुत चर्चेसाठी निवडलेले यापुढचे तत्त्व आहे, सेवा आणि साधने चांगली असावीत, ती उत्तम असण्याची आवश्यकता नाही. व्यवस्थापनात कार्यक्षमतेला विशेष महत्त्व आहे. कार्यक्षमता आणि खर्चाच्या प्रमाणात परिणामकारकता आणि उपयुक्तता या दोन्ही संकल्पनांच्या संदर्भात या तत्त्वाची सत्यता पटविता येईल.

सेवेसंबंधी उदाहरण घ्यायचे झाल्यास निर्देशित पद्धतींविषयी विचार करता येईल. समजा, ग्रंथपालाला एका निर्देशन पद्धतीची निवड करायची आहे, त्याच्यासमोर दोन पद्धती विचाराधीन आहेत. दोन्ही पद्धतींची प्रलेख प्रतिप्राप्तीची क्षमता चांगली आहे. एका पद्धतीची क्षमता ७० टक्के आहे, तर दुसरीची जवळजवळ ७५ टक्के आहे. आता पहिलीला चांगली म्हटले तर दुसरीला उत्तम म्हणणे क्रमप्राप्त आहे. आता प्रलेख प्रतिप्राप्तीची क्षमता ३/४ टक्के वाढविण्यासाठी लागणारा वेळ आणि होणारा खर्च परिणामकारकतेच्या आणि म्हणून उपयुक्ततेच्या संदर्भात अवाजवी ठरतो. अशा परिस्थितीत ब्रायन व्हिकरी यांच्या मतानुसार अवाजवी खर्चाचामुद्दा विचारात घेतल्यास पहिल्या पद्धतीला की जिची क्षमता ७० टक्के आहे, जास्त कार्यक्षम म्हणावे लागेल आणि म्हणून ती चांगली ठरून त्या पद्धतीची निवड करावी लागेल व उत्तम ठरलेल्या दुसऱ्या पद्धतीला दूर ठेवावे लागेल. कोलन वर्गीकरण पद्धतीबद्दल असेच म्हणावे लागते. ती पद्धती तात्त्विक दृष्ट्या उत्तम आहे. भारतात तिची निर्मिती झाली म्हणून ती शिकविली जाते; पण वापरली जात नाही.

आता साधनांच्यासंदर्भातील उदाहरण पाहू या. ग्रंथालयाला फोटोकॉपिंग सेवा सुरू करण्यासाठी झेरॉक्स मशीनची आवश्यकता आहे. बाजारात दोन वेगळी मॉडेल्स उपलब्ध आहेत. पैकी एक ग्रंथालयाच्या संपूर्णत: मालकीचे होऊ शकते, तर दुसऱ्यावर



काही प्रमाणात निर्मात्याचा हक्क राहणार आहे आणि म्हणून ग्रंथालयाला प्रत्येक प्रतीमागे काही रॉयल्टी द्यावी लागणार आहे. मशिनच्या मेंटेनन्सची जबाबदारी निर्मात्याची आहे. दोन्ही मॉडेल्स चांगली आहेत. पण मालकी हक्काचा विचार केल्यास पहिले हे निश्चितच उत्तम म्हणावे लागेल. मात्र फोटोकॉपिंग सेवेच्या कार्यक्षमतेचा आणि उपयुक्ततेचा विचार केल्यास रॉयल्टी द्यावी लागणार असलेल्या दुसऱ्या मॉडेलची निवड करणे संयुक्तिक होईल. कारण मशीन ज्या वेळी बंद पडेल त्या वेळी कंपनीचा तंत्रज्ञ रॉयल्टीचे उत्पन्न चालू रहावे म्हणून तात्काळ येऊन ते चालू करून देईल व ग्रंथालयाच्या सेवेत खंड पडणार नाही. अशा प्रकारे सेवा नेहमीच कार्यक्षम राहून ग्रंथालयाच्या उत्पन्नात घट येणार नाही. तरी ग्रंथालय व्यवस्थापनात चांगल्याची निवड करावी, उत्तमाच्या मागे जाऊ नये.

वर रंगनाथन यांच्या 'ग्रंथालय हे सतत वृद्धिंगत असते', या पाचव्या तत्त्वासंबंधी चर्चा करण्यात आली आहे. ग्रंथालयाची प्राकृतिक वाढ आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता यासंबंधीच्या व्यवस्थापनशास्त्रातील एका वेगळ्या तत्त्वाकडे आता नजर टाकूया. हे तत्त्व आहे '(अमर्याद) वाढही वस्तू किंवा सेवा यांचा दर्जा घसरण्यास कारणीभूत होते (Growth Destroys Quality).' ग्रंथालयांचा या तत्त्वाशी काय संबंध आहे,ते पाहणे जरुरीचे आहे.

माहिती आणि साहित्य यांचा चालू असणारा परिस्फोट आणि उपलब्ध असलेले अनुदान पूर्णपणे वापरण्याकडे ग्रंथपालांची स्वाभाविक प्रवृत्ती यामुळे निदान विद्यापीठ ग्रंथालयांचे संग्रह नेहमीच वाढते राहतात. मूळच्या इमारतीमध्ये ग्रंथसंग्रह कक्षासाठी केलेली तरतूद दिवसेंदिवस अपुरी पडू लागते. नवी इमारत उभी करण्यासाठी किंवा सध्या असलेल्या संग्रहकक्षाचा विस्तार करण्यासाठी जरूर असलेले अनुदान चटकन मिळत नाही. अशा वेळी ग्रंथालयीन सेवांच्या आणि इमारतीसंबंधीच्या परिणामांचा ऱ्हास सुरू होतो. रॅकमधील प्रत्येक शेल्फवर पुस्तकांची हलवाहलव करण्यासाठी सहा इंच जागा मोकळी ठेवणे बंद होते. दोन समोरासमोरील रांगांमधील मुक्तव्दार सुविधेचा लाभ घेण्यासाठी ठेवलेल्या चार फूट अंतराचा संकोच होऊन हे तीन फूट किंवा त्याहूनही कमी करण्यात येते. कित्येक ग्रंथालयात जागेअभावी पुस्तके जमिनीवर पडून असतात. याचा परिणाम म्हणून वाचकांना मुक्तव्दार सुविधेचा लाभ पाहिजे तसा घेता येत नाही. मागणी केलेले पुस्तक मिळवण्यासाठी वाचकांना वाट पाहात बसावे लागते, असे काही वर्षांपूर्वी अ‍ॅस्लीब प्रोसिडिंग्जमध्ये अ‍ॅशवर्थ यांनी आपल्या एका लेखात नमूद केले आहे. जेव्हा वाचकांची संख्या वाढते तेव्हा वाचनकक्षात प्रत्येक वाचकासाठी २५ स्क्वेअर फूट हे आयएस-१५५-१०६६ मधील परिमाण बाजूला ठेवावे लागते. त्याचप्रमाणे वाचकांच्या संख्येतील वाढ आणि

ग्रंथसंग्रहाचा झालेला विस्तार याचा एकत्रित परिणाम म्हणून देवघेव विभागात लांब रांगा लागतात.

ग्रंथालयांच्या संपादनात झालेल्या वाढीमुळे काही वर्षांपूर्वी अमेरिकेतील विद्यापीठ ग्रंथालयात तालिकीकरणाची फार मोठी समस्या निर्माण झाली. ती समस्या सोडविण्यासाठी (CIP) ही योजना लायब्ररी ऑफ काँग्रेसला सुरू करावी लागली. ग्रंथशोधाचे साधन म्हणून लांबी वाढलेल्या तालिकेची क्षमता कमी झाली. अशा प्रकारे अमर्याद आणि सतत होत जाणाऱ्या प्राकृतिक वाढीचा ग्रंथालयीन सेवांच्या क्षमतेवर आणि सेवकांच्या कार्यक्षमतेवर नको तो परिणाम झाला. सेवांचा दर्जा घसरू लागला. यावर एकच उपाय होता आणि तो म्हणजे ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञानाचे आयोजन.

वर चर्चिलेल्या एकूण सहा तत्त्वांखेरीज इतर अनेक तत्त्वे ग्रंथालयशास्त्रांत मांडली गेली आहेत. इतर अनेक शास्त्रांमधून ग्रंथपालांनी स्वीकारली आहेत. जागेअभावी त्यांची चर्चा येथे केली नसली तरी ती तत्त्वेसुद्धा वरील तत्त्वांइतकीच महत्त्वाची आहेत.



# ग्रंथालयशास्त्राची तात्त्विक बैठक (भाग–२)

***–प्रा. म. रा. रिसवडकर***
निवृत्त प्राध्यापक,
सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे

*युज आणि युजर स्टडीच्या आधारे ग्रंथसंग्रह विकास करण्याकडे म्हणाव्या त्या गांभीर्याने लक्ष पुरविले जात नाही. या गांभीर्याबद्दल दृष्टी देणारा हा लेख....*

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी ग्रंथालयशास्त्राचा पाया म्हणून जे विषय भावी ग्रंथपाल शिकतो त्यांपैकी एक विषय आहे ग्रंथनिवड (Book Selection) हा. शिकत असताना ह्या विषयाचे महत्त्व तितकेसे लक्षात घेतले जात नाही. वर्गात आणि नंतर परीक्षेच्या माध्यमातून ते ठसविलेही जात नाही. मध्यंतरीच्या काळात वर्गीकरण या विषयाला अकारण अवास्तव महत्त्व देण्यात आले आणि ग्रंथनिवडीसारख्या अतिमहत्त्वाच्या विषयाकडे शिकवणारे आणि शिकणारे या दोघांकडून दुर्लक्ष झाले. ग्रंथालयातील ज्ञानसाधन संग्रहाचा विकास ही ग्रंथपालाची विशेषतः महाविद्यालयीन आणि विश्वविद्यालयीन मुख्य जबाबदारी आहे. ही जबाबदारी ग्रंथपाल ग्रंथनिवड आणि सूचीनिर्मिती या दोन विषयांतील त्याचे ज्ञान आणि त्याचा अनुभव यांच्या आधारे पार पाडतो. साधन संग्रहाच्या विकासासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि अनुभव व जबाबदारी पार पाडण्याची कार्यक्षमता ग्रंथपालांमध्ये आहे, या समजुतीमुळेच उच्चशिक्षण आणि संशोधन संस्थामधील ग्रंथपालाला शिक्षकाचा दर्जा देण्यात आला आहे. एक परीक्षक म्हणून प्रस्तुत लेखकाचा अनुभव असा आहे की, अगदी उच्च पातळीवरील परीक्षेत संग्रह विकास (Collection Development) याविषयी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर लिहिणाऱ्यांचे प्रमाण दोन ते तीन टक्के इतके कमी आहे. तरी ग्रंथनिवड या विषयाचे महत्त्व लक्षात येण्यास इतपत चर्चा पुरेशी आहे.

प्रत्येक बी.लिब. झालेल्या विद्यार्थ्याला ग्रंथनिवडीची तीन तत्त्वे परिचित असतील. ही तीन तत्त्वे आहेत अनुक्रमे मेल्व्हिल ड्यूई, ॲलन ड्रयूरी आणि मॅकोल्व्हीन यांची. यांपैकी ड्यूई यांच्या तत्त्वावर ज्ञानगंगोत्रीच्या मागील लेखात चर्चा करण्यात आली आहे. या तत्त्वाचा आणि ग्रंथपालांना सुपरिचित असलेल्या व्यवस्थापन आणि अर्थशास्त्रातून आलेल्या परिणामकारकतेच्या प्रमाणात खर्च (Cost Effectiveness) या संकल्पनेचा संबंध स्पष्ट झाला आहे. तरी ग्रंथनिवडीच्या तीन तत्त्वांपैकी राहिलेल्या दोन तत्त्वांची चर्चा येथे करण्यात आली आहे.

अॅलन ड्र्यूरी यांच्या तत्त्वाचा उल्लेख नेहमी डिमांड थिअरी असा केला जातो. इंग्रजी भाषेतील ग्रंथालयशास्त्राच्या साहित्यात –Want, Need आणि Demand या शब्दांना मराठीत योग्य असा शब्द दिसत नाही. थोडक्यात, Want- म्हणजे असे म्हणता येईल की, उपभोक्त्याने आपल्या माहितीविषयक गरजेसंबंधी किंवा ती गरज अमुक एक माहिती साधन भागवू शकेल, याबद्दल केलेला अंदाज आणि त्याच्या अनुषंगाने केलेली मागणी. तरी उपभोक्त्याला ग्रंथालयातून हवी असलेली माहिती किंवा साधन (Want) ही त्याची गरज (Need) असेलच असे नाही. हा झाला Want आणि Need मधील फरक. गरज जेव्हा व्यक्त केली जाते तेव्हा तिचे रूपांतर मागणीत होते. (Demand is an Expressed Need) तेव्हा ड्र्यूरी यांचे ग्रंथनिवडीसंबंधीचे तत्त्व असे, की मागणीनुसार ज्ञानसाधनांची तरतूद असावी.

या ठिकाणी मागणी म्हणजे केवळ उपभोक्त्याने प्रत्यक्ष येऊन तोंडी किंवा लेखी केलेली विचारणा एवढेच नव्हे तर अपेक्षित (Anticipated) मागणीसुद्धा अभिप्रेत आहे. निर्देश किंवा निर्देशन पद्धती आणि तालिका तयार करताना ज्याप्रमाणे अपेक्षित प्रश्नांचा (Anticipated Question or Requests) विचार करावा लागतो, त्याचप्रमाणे ग्रंथनिवड करताना अपेक्षित मागण्यांचा विचार होतो. अशा तऱ्हेचा विचार उपभोक्त्यांच्या गरजांबद्दल पूर्वकल्पना असल्याशिवाय होणार नाही. पूर्वकल्पना देण्यासाठी युज आणि युजर स्टडीजचे आयोजन आवश्यक आहे. त्या मार्गानेच उपभोक्त्यांच्या गरजांबद्दल अंदाज बांधता येतो व वरील तत्त्वांत सांगितल्याप्रमाणे मागणीनुसार ग्रंथालयाच्या संग्रहात ज्ञानसाधनांची तरतूद करता येते. योग्य त्या ग्रंथ निवडीच्या आयोजनाने ग्रंथसंग्रहाचा विकास साधतो.

मॅकोल्व्हीन यांचे ‘Right Book For The Right Reader At The Right Time’ हे तत्त्व ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या हल्लीच्या भाषेत Information Delayed is Information Denied असे लिहावे लागेल. या तत्त्वातील जे तीन घटक आहेत- पुस्तक, वाचक आणि वेळ, यांतील सर्वांत अर्थपूर्ण (Most Significant) घटक आहे वेळ हा. माहिती किंवा माहिती साधन वेळेवर उपलब्ध नसेल आणि गरज संपल्यावर उपलब्ध होणार असेल तर अशी सेवा निरर्थक, निरुपयोगी आहे. ग्रंथालयीन सेवेतील अशा प्रसंगांना वर्नर कुझ आणि त्यांचे सहकारी यांनी त्यांच्या Methods Of Analysis And Evaluation Of Information Needs मध्ये Critical Incidents (सेवेमध्ये उद्भवलेले गंभीर प्रसंग) असे म्हटले आहे. वर्नर कुझ युजर रिसर्चमध्ये युज स्टडी, युजर स्टडी, डीसेमिशन स्टडी यांच्याबरोबर क्रिटिकल इन्सिडन्टस स्टडीजचा समावेश करतात. अॅस्लिबच्या एका अभ्यासात असे आढळून आले की, एका ग्रंथालयातील मागणीप्रमाणे खरेदी केलेल्या



दोन वर्षांतील पुस्तकांपैकी चाळीस टक्के पुस्तके केव्हाही वापरली गेली नाहीत. त्यांच्याबद्दल उपभोक्त्यांनी ती उपलब्ध झाल्यानंतर एकदाही विचारणा केली नाही. त्याच्या कारणांचा शोध घेता असे दिसून आले की, न वापरलेली पुस्तके ग्रंथालयात गरज संपल्यानंतर उपलब्ध झाली म्हणून मॅकॉल्व्हिन यांच्या तत्त्वातील वेळ या घटकाला फार महत्त्व आहे. हा अॅस्लिबचा अभ्यास क्रिटिकल इन्सिडन्ट स्टडीच आहे.

थोडक्यात ग्रंथनिवड आणि ग्रंथसंग्रह विकास या दोन कार्यांच्या संदर्भात वरील दोन तत्त्वे अतिशय मार्गदर्शक आहेत. विकसित साधनसंग्रहाचे दोन गुणधर्म आहेत : मागणीनुसार तरतूद आणि वेळेवर उपलब्धता.

या दोन गुणधर्मांचा परिणाम असा होतो की, ग्रंथालयात आपल्याला हवी ती गोष्ट उपलब्ध असणार असा भरवसा उपभोक्त्याला वाटतो आणि त्याच्या मनात ‘ग्रंथालयीन विश्वसनीयते’ची भावना निर्माण होते. अशा प्रकारच्या विश्वसनीयतेलाच डग्लस फोस्केट यांनी Bibliographic Security असे म्हटले आहे.

# आधुनिक ग्रंथालयात क्लाऊड स्टोअरेजचा वापर

***–श्री. प्रकाश बर्वे***
सहायक ग्रंथपाल,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
***श्री. शैलेश शुक्ल***
एम. लिब. विद्यार्थी, अभ्यासकेंद्र, नाशिक

संगणकाने अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर प्रगती केलेली आहे ''क्लाऊड कॉम्प्युटिंग'' हा त्यामधील प्रगत संशोधनाचा एक भाग. क्लाऊड कॉम्प्युटिंग म्हणजे काय? त्याचा इतिहास, आवश्यकता, प्रकार, वैशिष्ट्ये, फायदे, तोटे, गोपनीयता सुरक्षितता यांची थोडक्यात माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच ग्रंथालयात क्लाऊड स्टोअरेजचा वापर कसा करता येईल याची माहिती मिळवणार आहोत.

**शोध संज्ञा:–**
(१) क्लाऊड कॉम्प्युटिंग (२) क्लाऊड स्टोरेज

## प्रस्तावना

आपण संगणकाच्या विकासाच्या महत्त्वाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. दिवसेंदिवस वेगवेगळे तंत्रज्ञान विकसित होत आहे. त्यापैकी संगणक तंत्राचा वापर सर्व ठिकाणी सर्व क्षेत्रात आपणास पहावयास मिळतो. संगणक तंत्राचा विकास होताना त्यात आलेले बदल त्याचप्रमाणे संगणकीकरणात आधी वापरलेले तंत्रज्ञान बदलून नवीन तंत्रज्ञानासह ते वापरत आणले गेले. उदा: e-Publications Digital libraries, Internet usage, Web tools applications इ. सर्व साधनांचा वापर करताना संगणक तंत्राचा वापर करताना त्याचा व्याप संगणकाच्या ठिकाणी केंद्रित होता. प्रत्येक संस्थेत, ग्रंथालयात, कंपनीत आवश्यक आज्ञावली (Software), सर्व्हर, क्लायंट, मशीन्स, वर्ड प्रोसेसिंगची लायसन्सेस हे सर्व संस्था, ग्रंथालय, कंपनीच्या ठिकाणी निर्माण केलेली माहिती, तंत्रज्ञान सामग्रीचे एकत्रीकरण पाहायला मिळते. मोठ्या प्रमाणात डेटा एकत्रित होऊ लागला. संगणक तंत्राचा विकास होत



असताना तंत्रज्ञानावर एवढा खर्च करायचा का? यावर नियंत्रण ठेवता येईल का? याचा विचार करता तसेच अनेक प्रश्नांची उत्तरे शोधता शोधता क्लाऊड कॉम्प्युटिंग या नव्या संकल्पनेचा उदय झाला.

## क्लाऊड कॉम्प्युटिंगचा इतिहास

क्लाऊड कॉम्प्युटिंगचा शोध सर्वप्रथम (Joseph Carl Robnett Licklider) यांनी १९६० साली लावला. ते (ARPANET) येथे कामाला होते. तेथे प्रथम त्यांनी डेटा कोठेही, केव्हाही आपण शोधू शकतो हे शोधून काढले. त्यानंतर १९८३ मध्ये (CompuServe) या कंपनीने आपल्या ग्राहकासाठी कमी स्टोअर किमतीची डिस्क तयार केली, त्यात ते डेटा स्टोअर करू शकत होते. १९८४ मध्ये (AT&T) ने वैयक्तिक लिंक सर्व्हिस अस्तित्वात आणली. ही लिंक वैयक्तिक ठिकाणी, कंपनीत (Web-based) वर ती (Store) केली गेली. १९९४ मध्ये (AT&T) या कंपनीने वैयक्तिक कमी वेळ चालणारे क्लाऊड कॉम्प्युटिंगचे उत्पादन सुरु केले.

## क्लाऊड कॉम्प्युटिंग म्हणजे?

क्लाऊड कॉम्प्युटिंग म्हणजे ''कंपनीत, संस्थेत, ग्रंथालयात संगणकीकृत कामासाठी संस्थेच्या ठिकाणी असलेली कॉम्प्युटिंगची व्यवस्था न वापरता त्यासाठी रिमोट किवा तिऱ्हाईत ठिकाणच्या कॉम्प्युटिंग स्रोत व व्यवस्थेचा वापर करणे होय.''

"Cloud Computing is a type of Computing that relies on Sharing Computing Resources Rather than having local Server or Personal Devices to Handle Applications".

संगणकाच्या कामामध्ये म्हणजे आज्ञावलीसह केल्या जाणाऱ्या कामापासून ते ऑफिसच्या कामामध्ये केल्या जाणाऱ्या संगणकाच्या वापरास कॉम्प्युटिंग ही संज्ञा वापरली जाते. माहिती तंत्रज्ञानात संगणक तंत्रज्ञान, टेलिकम्युनिकेशन तंत्रज्ञानाबरोबर इंटरनेट तंत्रज्ञानाचा वापर होतो. नेटवर्क परिस्थितीत हे चालू असते. इंटरनेट तंत्रज्ञानामध्ये सर्व्हर हा कुठल्यातरी रिमोट किवा अनोळखी ठिकाणी असतो व आपल्या कडील असलेल्या संगणकाच्या आधारे (ज्यास आपण क्लाएंट म्हणतो) सुविधा उपलब्ध करता येते.

क्लाऊड कॉम्प्युटिंग अंतर्गत वापरणाऱ्यास त्यांना त्यांच्या कॉम्प्युटिंगसाठी लागणाऱ्या सर्व सोई सुविधा क्लाऊड सर्व्हरकडून प्रदान केल्या जातात. वापरणाऱ्याकडे केवळ एक इंटरनेट ब्राउझर क्षमतेचा संगणक असला पाहिजे. त्यासाठी

संगणकात क्लाऊड सर्व्हरचा क्लाएंट प्रस्थापित करण्याचीही आवश्यकता नसते. वापरण्यास किंवा एकूणच एखाद्या कंपनीच्या सर्व गरजा भागवण्याची जबाबदारी ही क्लाऊड सर्व्हरची असते. यासाठी क्लाऊड सर्व्हर सुविधा देणाऱ्या कंपनीस पैसे द्यावे लागतात. पण हा खर्च कॉम्प्युटिंगची व्यवस्था कंपनीच्या ठिकाणी निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या खर्चापेक्षा निश्चित कमी असतो. क्लाऊड सर्व्हरकडे या कामाचे व त्याच्या व्यवस्थापनाचे नियंत्रण असते. पायाभूत सेवांच्या नूतनीकरण परवान्यासकट उपभोक्त्यास सुविधा दिल्या जातात. सर्व काम इंटरनेटच्या माध्यमातून चालते. सर्व डेटा एका सर्व्हरमध्ये साठवला जातो, हवी तेवढ्या प्रमाणात डेटा स्पेस कमी अधिक प्रमाणात मिळवता येते. इंटरनेटशी कनेक्ट असलेला संगणक डिव्हाईसद्वारा क्लाऊडस्थित व्यवस्थेशी संपर्क करता येतो. ज्यायोगे कॉम्प्युटिंगची शक्ती, कृती, तसेच फाईल्सचा वापर करता येतो. वापरणारा आपल्या वैयक्तिक फाईल्स, म्युझिक फाईल्स, बुकमार्क, व्हिडिओ सर्व्हरमध्ये साठवून हवे तेव्हा वापरू शकतो. त्यासाठी त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारची साठवण व्यवस्था किवा स्टोर करण्याची गरज नाही उदा. G-mail, HotMail, Yahoo.

## क्लाऊड कॉम्प्युटिंगची आवश्यकता

आतापर्यंत माहिती तंत्रज्ञान एक आधुनिक तंत्रज्ञान म्हणून स्वीकारले गेले. तंत्रज्ञान म्हटले म्हणजे त्यासाठी खर्च हा लागणारच. तंत्रज्ञान वापरताना त्याच्या किमतीचा त्याच्या फायद्याशी तुलना करण्यात काहीच साध्य होत नाही. उदा. कॉम्प्युटिंगचे नियोजन, आज्ञावली खरेदी, नूतनीकरण, संगणक सामग्री, डेटा सुरक्षितता, इ. मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. यावर उपाय म्हणून क्लाऊड कॉम्प्युटिंगकडे पाहिले जाते. आज मोठ्या प्रमाणावर क्लाऊड कॉम्प्युटिंगच्या सुविधा देणाऱ्या कंपन्या उपलब्ध आहे. उदा.: Amazon Cloud, IBM, Google, Microsoft, SalesForce.Com या कंपन्या क्लाऊड सेवा देतात. त्यासाठी ठराविक अशी रक्कम कंपन्यांना द्यावी लागते.

## क्लाऊड कॉम्प्युटिंगचे प्रकार

## (A) Service Model :

### (1) Software as a Service ( SaaS) :

या मॉडेलमध्ये Software Cloud वर Store केलेले असते. मागणीनुसार या Software च्या सुविधा पुरवल्या जातात. यासाठी



मोठ्या प्रमाणावर सर्व्हरवर गुंतवणूक करायची आवश्यकता नसते किंवा लायसन्सची आवश्यकता नसते. कंपनीने रेडीमेड तयार केलेले Software वापरता येते. या प्रकारात तयार Software वापरण्यासाठी देतात. उदा. ERP, E-mail.

### (2) Platform as a Service ( PaaS) :

कोणतेही एखादे Software तयार करण्यासाठी Platform तयार करून देतात. Software मध्ये जर काही बदल करायचे असल्यास त्यासाठी Platform तयार करून दिला जातो. उदा. Linux, Apache, MySQL & PHP.

### (3) Infrastructure as a Service ( IaaS) :

IaaS मुख्य करून Software सोडून उदा. Printer, Monitor, CPU या व्यतिरिक्त लागणारे सर्व साहित्य उपलब्ध करून दिले जाते. यालाच Infrastucture as a Service असे म्हणतात. Organisation पाहिजे तेव्हा Infrastructure मध्ये सुधारणा करू शकते. उदा. Amazon Web Service, Rackspace, HP, IBM, Sun, and Google.

## (B) Deployment Model :

### (1) Public Cloud :

हा पारंपरिक पद्धतीवर आधारित क्लाऊड प्रकार होय. ज्यात Compting स्रोत फाईन ग्रेनड पद्धतीने स्वतःचे स्रोत स्वतः वापरा या आधारावर उपलब्ध केले जाते. अर्थात संपर्कासाठी माध्यम इंटरनेटच असते व ते तिऱ्हाईत पार्टीच्या सेवातून उपलब्ध होत असते. यास External Cloud असेही म्हणतात. उदा. एखाद्या विद्यापीठाचे Question Paper सर्वांसाठी एखाद्या Website वर स्टोअर केलेले असतात. पाहिजे त्या वेळेस ज्यांना पाहिजे त्यांना ते उपलब्ध होऊ शकतात.

### (2) Private Cloud :

यास इंटरनल क्लाऊड असेही म्हणतात. एखाद्या संघटनेसाठी खास तयार केलेली खास सुविधा आहे. त्यामुळे Public Cloud पेक्षा

या सेवा महाग असतात. त्याचा वापर एकत्रितपणे केला जात नाही. Private Cloud मध्ये Public Cloud पेक्षा जास्त सुरक्षितता असते.

**(3) Hybrid Cloud :**

Public Cloud आणि Private Cloud च्या एकत्रीकरणातून Hybrid Cloud ची सोय उपलब्ध होते. काही संस्था Public Cloud अंतर्गत सुरक्षित अशा सेवा देऊ शकतात. काही संस्था नेहमीसाठी स्वतःच्या कॉम्प्युटिंगच्या सेवा वापरतात व कामाचा ताण असेल तेव्हा क्लाऊडच्या सुविधा वापरतात.

**(4) Community Cloud :**

सामूहिक क्लाऊड हा प्रकार आहे. एकसारख्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांसाठी निर्माण केलेल्या क्लाउडला Community क्लाऊड असे म्हणतात. अशा ठिकाणी असलेले कॉम्प्युटिंगचे स्रोत्र त्या सर्व संस्था एकत्रितपणे वापरतात. त्यामुळे अशा क्लाऊडसाठी लागणारा खर्च विभागाला जातो. उदा.: सर्व सरकारी एजन्सीजसाठी उपलब्ध केलेले क्लाऊड. अशा संस्थांमध्ये इतर संस्थांचा शिरकाव नसतो.

## क्लाऊड कॉम्प्युटिंगची वैशिष्ट्ये

**(1) Self Healing :**

जर एखादी Service क्लाऊड कॉम्प्युटिंग अंतर्गत चालत असेल तर तो त्यात स्वतःहून सुधारणा करतो. जर एखादे Application अचानक बंद पडले तरी त्याचा Backup दुसऱ्यावर तयार असतो. त्यामुळे कोणतीही अडचण येत नाही. त्यामध्ये तो स्वतःहून सुधारणा करतो.

**(2) Multi-tenancy :**

एकाचवेळी अनेक जण एकाच वेळी एकावर काम करू शकतात.

**(3) Service Oriented :**

वेगवेगळ्या गोष्टीची माहिती आपल्याला माहीत होते. आपल्या व्यवसायात कोणकोणते बदल होत आहे याची माहिती आपणास क्लाऊड कॉम्प्युटिंगद्वारे माहीत होते.



**(4) Linearly Scalable :**

क्लाऊड कॉम्प्युटिंग व्यवस्था गरजेप्रमाणे बदल करते जर कामातील लोड जास्त प्रमाणात असेल तर. जर एका Server मध्ये 1,000 Transactions per Second असेल तेव्हा गरजे प्रमाणे तो दुसऱ्याची मदत घेऊन 2,000 Transactions per Second याप्रमाणे मागणीनुसार बदल करू शकतो.

**(5) Virtualized :**

आभासी सेवा प्रत्यक्षपणे काम झालेले दिसत नाही, परंतु झालेले काम एका विशिष्ट ठिकाणी साठवले जाते व पाहिजे तेव्हा साठवलेला डेटा जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात पाहता येतो त्यासाठी Login ID व Password दिलेले असतात.

**(6) Flexible :**

क्लाऊड कॉम्प्युटिंगमध्ये पाहिजे तसे बदल करता येतात. साठवण क्षमता वाढवायची असेल, मध्ये काही बदल करायचे असल्यास ते करता येतात.

### क्लाऊड कॉम्प्युटिंगचे फायदे:–

१. किंमत कमी.
२. जशी हवी तशी सेवा प्रदान केली जाते.
३. विविध कॉम्प्युटिंगचे एकत्रीकरण.
४. डेटा (Data) कोठेही पाहता येतो.
५. एकाच वेळी अनेक काम करू शकतात.
६. Easy Maintenance.
७. OPAC / Web OPAC ची सुविधा.

### क्लाऊड कॉम्प्युटिंगचे तोटे:–

१. डेटा चोरीला जाण्याची शक्यता.
२. पाहिजे तशी सुरक्षितता नाही.
३. नवीन बदल करायचे असल्यास त्याची वेगळी किंमत मोजावी लागते.
४. कायमची सुविधा लागते.
५. क्लाऊडची निवड करताना प्रकारानुसार किंमत मोजावी लागते.
६. डेटा एकत्रीकरणाचा धोका.

## क्लाऊड कॉम्प्युटिंगची गोपनीयता आणि सुरक्षितता

### गोपनीयता:-

जेव्हा दळणवळण सुविधा देणाऱ्या कंपन्यांचा डेटा ई-बिजनेसद्वारा केले जाणारे आर्थिक व्यवहार, अतिरेकी, तसेच गुन्हेगारी संबंधातील गोपनीय माहितीचा तपशील क्लाऊड कॉम्प्युटिंगच्या साहाय्याने हाताळायचे असल्यास सर्व कामामधील गोपनीयता राखायचे काम अवघड आहे. असे धोके लक्षात घेऊन काही कंपन्या त्यावर गोपनीयता सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. उदा. US-EU, Safe Harboor किंवा Amazon द्वारा उपलब्ध क्लाऊडमधील सेफ झोन निवडण्याची सोय असे असले तरी त्यावर अजून पूर्ण नियंत्रण आलेले नाही. क्लाऊड निर्मितीसंबंधी काम करणाऱ्या तंत्रापुढे खरे तर हे आव्हान आहे.

### सुरक्षितता :

क्लाऊडच्या बाबतीत दुसरा काळजीचा मुद्दा म्हणजे क्लाऊडवर ठेवलेल्या माहितीची सुरक्षितता होय. व्यापारी, संस्था, कंपन्या क्लाऊड कॉम्प्युटिंगच्या सुविधांचा लाभ घेण्याचे ठरवतात. क्लाऊडचे अस्तित्व कंपन्याच्या बाहेर कुठेतरी कदाचित देशाबाहेरील एखाद्या अनोळखी ठिकाणीही असू शकते. अशा परिस्थितीत एखाद्या कंपनीबद्दल खाजगी तपशील भविष्यकाळातील योजना किंवा काही महत्त्वाची अशी माहिती क्लाऊडच्या सर्व्हरकडे पाठवून त्यात साठवणे किती सुरक्षित आहे याचा प्रश्न निर्माण होतो. उदा.

१. संवेदनक्षम डेटाची उपलब्धता.
२. डेटा (Data) एकत्रीकरणाचा धोका.
३. कार्यप्रणालीतील चूक शोधणे.
४. हरवलेला डेटा मिळवणे.
५. क्लाऊड अंतर्गत डेटा चोरीचा धोका.
६. हार्डवेअर हॅक होण्याची शक्यता.
७. खाते नियंत्रण.

या सर्व सुरक्षितता बाबींवर काहीअंशी उपायातून नियंत्रण ठेवणे शक्य असते. उदा. Cryptography विविध भाषा माहिती दळणवळणाद्वारे धोके विश्लेषणाद्वारे शोधण्याच्या पद्धती किंवा एकाच क्लाऊडवर अवलंबून न राहता विविध क्लाऊड सोयीचा स्वीकार करणे.

आज क्लाऊड तंत्रज्ञानातील APTS मानकीकरण इ. गोष्टींद्वारे पूर्णपणे नाही, पण बऱ्यापैकी सुरक्षितता सांभाळणे शक्य आहे.



## क्लाऊड कॉम्प्युटिंगविषयी बंधने आणि कायदे:-

क्लाऊड वापरातील धोके लक्षात घेता क्लाऊड कंपन्यावर ठराविक मान्यता Compliances स्वीकारणे बंधनकारक आहे. उदा. अमेरिका आणि युरोपियन युनियन अंतर्गत देशासाठी असे अनेक बंधनकारक उपलब्ध केलेले आहेत. उदा. FISMA, HIPPA, SOX डेटा सुरक्षित विशेषतः Credit Card व्यवहारा संबंधी PCS, DSS इ. बंधने लक्षात घेता बहुतेक वेळा Community किंवा Hybrid Cloud सुविधा स्वीकारण्याशिवाय पर्याय राहत नाही. या पार्श्वभूमीवर Google द्वारा उपलब्ध क्लाऊड सुविधा सरकारी कार्याची पूर्तता करण्यात यशस्वी झाली आहे. Amazon-सारख्या क्लाऊड सुविधा देणाऱ्या कंपन्यांनी -SAS-70, Type-II चे प्रमाणपत्र बनवले आहे.

## क्लाऊड कॉम्प्युटिंग तंत्राचा क्लाऊड स्टोअरेजअंतर्गत ग्रंथालयाचे बदलते स्वरूप

१९९० पर्यंत ग्रंथालय आधुनिकीकरण केवळ ग्रंथालय संगणकीकरण प्रक्रियेशी संबंधित होते. या कामासाठी उपयोगात आणलेल्या आज्ञावली ग्रंथालयात स्थानिक स्तरावर उपलब्ध होत्या, परंतु सध्याचे ग्रंथालय आधुनिकीकरण हे ग्रंथालय संगणकीकरणापुरते मर्यादित राहिले नसून ते विश्वव्यापक झाले आहे. ग्रंथालयात उपलब्ध होणारे स्रोत जगातील कुठल्याही ठिकाणाहून येऊ शकतात. सतत दिवसरात्र केव्हाही, कोठेही मिळू शकतात. वेब 2.0 तंत्रज्ञान हे एक क्लाऊड कॉम्प्युटिंगचे सुरुवातीचे उदाहरण मानावे लागेल. उदा. बुकमार्किंग साईट, Social Networking Site, Video, YouTube वर ठेवून स्लाईड शेअर अंतर्गत सादरीकरण करणे.

क्लाऊड कॉम्प्युटिंगअंतर्गत ग्रंथालये माहिती साठवण, माहिती प्रतिप्राप्ती डेटा शेअरिंग आज्ञावली -Application या साधनांचा एकत्रित उपयोग करू शकतात. SalesForce.com ही त्यापैकी ग्रंथालयासाठी क्लाऊड कॉम्प्युटिंग सेवा उपलब्ध करून देणारी कंपनी आहे. Google Apps Engine, OCLC, World cat, First Search या सेवांच्या माध्यमातून अनेक ग्रंथालयांना एकत्रित आणले आहे. त्यामुळे त्या ग्रंथालयातील वाचकांना ग्रंथालय बाह्य जगातील ग्रंथालयाच्या सेवा आणि संग्रह तालिका उपलब्ध करून दिल्या आहे. शिवाय ग्रंथालयांना एकत्रितपणे कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

## ग्रंथालयात क्लाऊड स्टोअरेजचा वापर:–

**(1) Building Digital Library :-**

आज मोठ्या प्रमाणावर Digital Library ही संकल्पना तयार होत आहे. क्लाऊड कॉम्प्युटिंगमुळे एका ठिकाणाहून आपल्याला वेगवेगळ्या विषयांची ग्रंथालयांची माहिती उपलब्ध होऊ शकते. वेगवेगळे Research Paper, Journal, E-Books इ. आपल्याला ग्रंथालयात बसून आपण त्याबद्दलची माहिती मिळवू शकतो.

**(2) Searching Library Data:-**

OCLC हे क्लाऊड कॉम्प्युटिंगचे चांगले उदाहरण देता येईल. OCLC Online Computer Library Centre, World Cat Service, अंतर्गत दर्जेदार तालिकीकरणासाठी ग्रंथालयांना प्रोत्साहन मिळाले आहे. या प्रकल्पांतर्गत ग्रंथालयांच्या महत्त्वाच्या कामाच्या उदा. उपाजेन अंतर्गत देवघेव याविषयी माहिती मिळते. तसेच E-books, E-Journal, यांची माहिती आपल्याला ई–स्वरूपात मिळते.

**(3) Website Hosting:-**

यात वेगवेगळ्या ग्रंथालयांचा डेटा, त्यांचा OPAC, वेबसाईडच्या साहाय्याने आपल्याला पाहता येते. त्यामुळे नवीन कोणकोणत्या नवीन संकल्पना येत आहे याची माहिती मिळते त्यासाठी स्वतःची Website ग्रंथालयांनी तयार केलेली असते.

**(4) Searching Scholarly Content:-**

शैक्षणिक उपयोगासाठी याचा वापर करता येतो. Research Paper, Journal शोधण्यासाठी क्लाऊडचा वापर करता येतो.

**(5) File Storage:-**

आपल्या ग्रंथालयाला उपयुक्त लागणारी महत्वाची माहिती आपण स्टोअर करून ठेवू शकतो. क्लाऊड कॉम्प्युटिंगमुळे स्टोअर करून ठेवल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आपण माहिती स्टोअर करून ठेवू शकतो. व लागेल तेव्हा त्याचा उपयोग करू शकतो.

**(6) Building Community Power:-**

ग्रंथालयीन नेटवर्किंगमुळे माहितीशास्त्राचे लोक एकत्रित आले व



नवीन वापर करणारेसुद्धा एकत्र आले. त्यामुळे प्रत्येक ग्रंथालयाच्या माहितीचा प्रसार होत गेला व त्यानुसार त्यात सुधारणा होत गेल्या. उदा. Facebook.

**7 Library Automation :-**

क्लाऊड स्टोअरेजच्या वापरामुळे संपूर्ण ग्रंथालय संगणकीकृत करता येते. देवघव पद्धत, नियतकालिका व्यवस्थापन, Registration, Purchase Order, Bill Statement इ. सर्व सेवा –Automation करून साध्य होऊ शकतात.

## समारोप

आज मोठ्या प्रमाणावर ग्रंथालये नवनवीन Software वर खर्च करण्यापेक्षा क्लाऊडवर उपलब्ध असलेले वेगवेगळे Software वापरताना दिसतात. त्यांना मिळणाऱ्या सुविधा, खर्च, सुरक्षितता या नवीन Software घेण्यापेक्षा नक्कीच कमी किमतीत उपलब्ध होतात. क्लाऊड स्टोरेजची माहिती विशिष्ट एका सर्व्हरवर सुरक्षित ठेवली जाते. ही माहिती गहाळ, चोरी किंवा डेटा बदली असे प्रकार होत नाही. त्यामुळे क्लाऊड स्टोरेज ही संकल्पना ग्रंथालयाच्या दृष्टीने नवीन व उपयोगी आहे.

## संदर्भ यादी


(१) द. ना. फडके : *ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण* आ–५वी युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.

(२) Kumar Saurabh : *Cloud Computing* 2nd ed. Wiley India.

(३) Gosavi N, Shinde S, Dhakulkar B : Vol-2, 2012, *Use of Cloud Computing in Library and Information Science Field*. International Journal of Digital Library Services.

(४) Kaushik A, and Kumar A : (2013) *Application Of Cloud Computing in Libraries International Journal of Information Dissemination and Technology*, 3(4), 270-273

(५) Sahu Rekhraj, Cloud Computing : *An Innovative Tool for Library Servives*. Cloud computing http://

en.wikipedia.org/wiki/cloud_Computing (Accessed on 18.11.2016)

(६) Khan, S.,Khan, S. & Gilibeen, S : (2011). *Cloud computing an emergingtechnology: Changing ways of libraries collaboration International Research: Journal of Library and Information Science*, 1(2).



# अजून ताजा वास जुन्याला
# भारतीय ग्रंथ संरक्षण कायद्याची शतार्ब्दी

**–प्रा. अ. का. प्रियोळकर**

*१८६७ साली भारतीय ग्रंथसंरक्षण कायदा अस्तित्वात आला. त्याला यंदाच्या वर्षी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. याचा अर्थ शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून खरे तर यंदा साजरे व्हायला हवे. यातूनच ग्रंथविषयक वेगवेगळे कायदे भारतात नंतर निर्माण झाले. ग्रंथविषयक निर्माण झालेला हा पहिला कायदा. १९६७ साली या कायद्याला १०० वर्षे झाल्याच्या प्रीत्यर्थ प्रा. अ. का. प्रियोळकरांनी प्रस्तुत लेख लिहिला होता. कायद्याची सद्य:स्थिती व त्यातील त्रुटी–दोष यांचा सारासार विचार प्रियोळकरांनी केला होता. त्याला ५० वर्ष झाली तरीही आज काय स्थिती आहे? अजूनही वाचून विचार करावा असा हा ताजा लेख!*

*–संपादक*

हिंदुस्थानातील मुद्रित ग्रंथ संरक्षणाच्या दृष्टीने १९६७ हे वर्ष फार महत्त्वाचे आहे; कारण शंभर वर्षांमागे १८६७ चा पंचविसावा ॲक्ट पास झाला. या Press and Registration of Books ॲक्टप्रमाणे प्रकाशकाने आपल्या प्रत्येक प्रकाशनाच्या तीन प्रती सरकारकडे सादर कराव्यात असा नियम झाला आणि देशातील मुद्रित प्रकाशनांच्या त्रैमासिक याद्या तयार होऊ लागल्या. अशाप्रकारे मुद्रित ग्रंथरक्षणाची काहीशी सुरुवात झाली.

युरोपात मुद्रणकलेचा प्रवेश पंधराव्या शतकाच्या मध्यात झाला. इ.स. १५००च्या आतील पुस्तके तिकडे फार महत्त्वाची समजली जातात. अशा १५०० पूर्वीच्या मुद्रितांना असे तिकडे नाव आहे. हिंदुस्थानात मुद्रणकलेचा प्रवेश सोळाव्या शतकाच्या मध्यात पोर्तुगीजांनी केला; परंतु तिचा सार्वत्रिक प्रसार झाला नाही. ती या मिशनरी लोकांपुरतीच मर्यादित राहिली आणि सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात तर त्यांचा प्रेसच बंद पडला.

हिंदुस्थानात मुद्रणकलेचा खरा प्रवेश एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी झाला असे म्हणावे लागते. लेखनकला फार जुन्या काळी हिंदुस्थानात अस्तित्वात आली

होती. संस्कृत ग्रंथ ताडपत्र (Palm leaves), भूर्जपत्र वगैरेवर लिहिण्यात येत असत. देशी भाषांचा जन्म व हिंदुस्थानात कागदाचा विशेष प्रसार साधारणत: एकाच वेळी, म्हणजे बाराव्या तेराव्या शतकात झाला; परंतु युरोप-अमेरिका या देशांमध्ये जसे ग्रंथसंग्राहक (Book Collectors) असतात तसे आपल्याकडे नव्हते. त्यामुळे या हस्तलिखित ग्रंथांचे रक्षण होऊ शकले नाही. आपल्याकडे जर ग्रंथसंरक्षणाकडे प्रवृत्ती असती, तर मुद्रणकला स्थिर होण्यापूर्वीच्या सुमारे सहा शतकांच्या काळातील किंवा त्याच्याही पूर्वीच्या हस्तलिखितांचा बचाव होऊ शकला असता आणि कित्येक कवींचे त्यांनी स्वत:च्या अक्षरात लिहिलेले ग्रंथ आज आपणास पाहावयाला सापडले असते. मुद्रणकला अस्तित्वात आल्यावर तर हस्तलिखितांकडे आपले फारच दुर्लक्ष झाले आणि त्यांचा नाश होऊ लागला. यापैकी बरीचशी संस्कृत हस्तलिखिते युरोपियन पंडितांनी किंवा त्यांच्या प्रेरणेने सरकारने गोळा केली व ती परदेशातील व देशांतील निरनिराळ्या सार्वजनिक संग्रहालयात जमा झाली आहेत. त्यांचे कॅटलॉगही तयार करण्यात आले आहेत. या युरोपियन पंडितांचे संस्कृत हस्तलिखितांप्रमाणे देशी भाषेतील हस्तलिखितांकडे लक्ष नव्हते. याचा परिणाम म्हणजे देशी भाषेच्या हस्तलिखितांचा अतोनात नाश झाला आहे.

मुद्रित ग्रंथांच्या संरक्षणाकडेदेखील पाश्चात्त्यांनी प्रथम आपले लक्ष वेधले. Royal Asiatic Society of Great Britain and Ireland या संस्थेचा डायरेक्टर आणि व्हाइस प्रेसिडेंट या लोकांनी सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया, Sir Charlws Wood, यांना मे १८६३ मध्ये लिहिले :-

"It is doubtless well known to you that of late years the Hindus have shown great literary activity, partly by editing numerous texts of their ancient Sanskrit literature, partly by translating English and Sanskrit works into their vernacular dialects, and partly by producing original compositions on subjects of a political, scientific and religious character. But though these books are very numerous, and in many respects important, and though they have an extensive circulation among the natives of India, only a very inconsiderable portion of them is at present accessible to European scholars; and the knowledge of these few is in most instances due to chance, or to the good will of disinterested person residing in India. It is unnecessary for us to dwell on the serious hindrance which has arisen from this circumstance to a proper appreciation of the actual condition of India or its inhabitants, equally from a scientific and from a political point of view, and in some degree, we may add, to a



proper administration of the country itself. Frequent attempts have indeed been made by scholars and booksellers in this country to remove this impediment, but they have proved altogether unavailing. It is therefore our conviction that there is here an urgent necessity for the authoritative assistance of Government, and that by this means alone the claims of Oriental Studies in England can be adequately satisfied.

This assistance would be, in our opinion, perfectly justified, also, on legal grounds. Five of our great libraries are entitled to a copy of every work published in the British Empire. The law conferring on them this privilege was intended to preclude the ultimate loss of any such book. Hitherto, however, these libraries have been practically deprived of the fruits of this privilege so far as India is concerned, chiefly, as we suppose, because the Hindus are unaware of the obligation imposed on them by law to furnish copies of their publications to the libraries in question.

In view of these facts, we would be permitted to suggest that the Indian authorities be instructed to give their attention to this matter, and at least to collect quarterly the titles of all Native books and pamphlets that issue from the Indian presses.

A catalogue of the publications of past years, as complete as might be found possible, would also possess great value. Moreover, inasmuch as a regular commercial intercourse between the booksellers of India and England would tend to increase the material resources of both countries, and prospectively to exercise a beneficial influence on the education of the natives, we would propose that the Indian authorities be also instructed to furnish the public with certain other items of information touching books published in India, agreeably to the enclosed form."

हे पत्र सेक्रेटरी ऑफ स्टेटने हिंदुस्थान सरकारकडे, त्यातील सूचनांची ताबडतोब अंमलबजावणी व्हावी अशी ता. २४ जुलै १८६३ रोजी शिफारस करून पाठविले आणि हिंदुस्थान सरकारच्या सेक्रेटरीने ते प्रांतिक सरकारकडे पाठविले.

मुंबई सरकारने ही कामगिरी त्यावेळचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इंस्ट्रक्शन Sir A. Grant यांजवर सोपवली. त्यांनी निरनिराळ्या कलेक्टर्स आणि मॅजिस्ट्रेट यांच्याकडून त्यांच्या अंमलाखाली असलेल्या छापखान्यांकडून आतापर्यंत प्रसिध्द झालेल्या पुस्तकांची माहिती मागविली. ती समाधानकारक न वाटल्यावरून पुन्हा डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरांमार्फत नव्या याद्या मागविल्या आणि १८६४ च्या

अखेरपर्यंत मुंबई इलाख्यांत प्रसिध्द झालेल्या पुस्तकांचा कॅटलॉग १८६६ साली छापून तयार केला. या कॅटलॉगांत असलेले दोष काढून टाकण्याकरिता तो निरनिराळ्या अनेक देशी व परदेशी विद्वानांकडे अवलोकनार्थ पाठविण्यात आला. यापैकी बऱ्याच विद्वानांच्या सूचना किंवा याद्या आल्या. त्यांच्या साहाय्याने पहिला कॅटलॉग सुधारून वाढविण्याची कामगिरी John Nugetn, I.C.S., ॲक्टिंग एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांजकडे देण्यात आली. शुध्दलेखन वगैरेसंबंधी त्यात किरकोळ सुधारणा डेक्कन कॉलेजचे प्रोफेसर Dr. Kielhorn यांनी केल्या आणि या कॅटलॉगची सुधारलेली द्वितीय आवृत्ती १८६७ साली प्रसिध्द झाली. या आवृत्तीला संस्कृत ग्रंथांसंबंधी डॉ. कीलहॉर्नचे आणि मराठी ग्रंथांसंबंधी त्यावेळी ॲक्टिंग मराठी ट्रॉन्सलेटर असलेले महादेव गोविंद रानडे यांची टाचणे जोडली आहेत. यापैकी रानडे यांचे टाचण त्यांच्या Mescellaneous Writings (१९१५) मध्ये प्रसिध्द झाल्यामुळे पुष्कळांच्या वाचनात असेल. कीलहॉर्न यांनी आपल्या टाचणात व्यक्त केलेले विचार लक्षात ठेवण्यासारखे आहेत. ते असे :-

There never has been, at least for the last two thousand years, an Indian public. The study of literature was always confined to the few who considered themselves by divine right the sole bearers of all mental culture. And these few did not study it merely to cultivate and elevate their minds, or to seek in it relaxation from more severe labours, and a source from which to draw new strength and vigour, but they made it their business to till the ground, or to battle with the enemy. We do not say this in depreciation of India; on the contrary, we might consider it rather a proof of the contentment and disinterestedness of Indian authors that they wrote without a public in our sense of the word.

हा कॅटलॉग ३१ डिसेंबर १८६४ पर्यंतच्या प्रकाशनांचा होता. त्याच्या पुढच्या म्हणजे १८६७ चा कायदा पास होईपर्यंतच्या म्हणजे १ जानेवारी १८६५ ते ३० जून १८६७ या कालावधीतील-प्रकाशनांचा पुरवणी कॅटलॉग १८६९ साली त्यावेळचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन J. B. Peile यांच्या नावाने प्रसिध्द झाला आहे. वास्तविक कृष्णशास्त्री चिपळुणकर यांनी तो तयार केला होता. याची नोंद त्या कॅटलॉगातच आहे.

आपल्या कॅटलॉगच्या पहिल्या आवृत्तीबरोबर ग्रँटने ता. १५ मार्च १८६६ चे जे पत्र मुंबई सरकारच्या शिक्षण खात्याच्या सचिवाला पाठविले त्यात या प्रकाशनासंबंधी एक कायदा पास करण्याची कल्पना त्याने सुचविली होती. या पत्राच्या शेवटी तो लिहितो ;



On This I beg to express my humble opinion that such an Act is extremely desirable, but that it should contain a clause providing that Government will in all cases pay the full published price of thee books thus furnished. I would suggest that two copies of every book published in the presidency should be in this manner taken by Government of which one should be deposited in the Library of the University of Bombay, and one transmitted to the India Office.

या सूचनेप्रमाणे हिंदुस्थान सरकारचा १८६७ सालचा २५वा कायदा पास झाला व तो ता. ६ एप्रिल १८६७ च्या The Gazette of India च्या अंकात प्रसिध्द झाला आहे.

वृत्तपत्रे व इतर बराच तपशील गाळून त्यातील Part III, Delivery of Books संबंधींचा मजकूर पुढे देतो :-

> Three copies of books printed after this Act comes into force and of all subsequent editions, to be delivered to Government within a month.

9. Three printed or lithographed copies of the whole of every book which shall be printed or lithographed in British India after this Act shall come into force, together with all maps, prints or other engravings belonging thereto, finished and coloured in the same manner as the best copies of the same shall be produced, and also of any second or subsequent edition which shall be so produced with any additions, whether the same shall be in letter-press or in the maps, prints or other engravings belonging thereto, and whether the first edition of such book shall have been produced before or after this Act shall come into force, shall, within one calendar month after the day on which any such book shall first be delivered out of the press, and notwithstanding any agreement (if the book b published) between the printer and publisher thereof, be delivered by the printer, bound, sewed and stitched together, and upon the best paper on which the same shall be printed or

lithographed, at such place and to such officer as the Government shall, by notification in the official Gazette, from time to time direct. The publisher of other person employing the printer shall, at a reasonable time before the expiration of the said month, finished and coloured as aforesaid, which may be necessary to enable him to comply with the requirements aforesaid. Nothing in the former part of this Section shall apply to any periodical work published in conformity with the rules laid down in Section 5 of this Act.

10. Such officer shall thereupon give a receipt in writing for the copies so received, and, if the book is for sale to the public, shall, on the publication thereof, pay the publisher for the same copies at the rate at which book shall be bona fide sold for cash to the public.

Receipt and payment for copies

11. One of such copies shall be transmitted to the Secretary of State for India, another copy shall be disposed of as the Governor General of India in Council shall from time to time, by general or special order, direct, and the remaining copy shall, after a memorandum containing the particulars hereinafter mentioned respecting the book shall have been registered as hereinafter provided, be deposited in such public library, or be otherwise disposed of, as the Local Government shall from time to time determine.

Disposal of the three copies.

वरील ९ व्या कलमात प्रत्येक पुस्तकाच्या तीन प्रती पाठवाव्या असे आहे त्या जागी, पुस्तक प्रसिध्द झाल्याबरोबर महिन्याच्या आत प्रथम एक प्रत पाठवावी व पुढे एका वर्षाच्या आत प्रांतिक सरकारने मागणी केल्यास आणखी एक किंवा जास्तीतजास्त दोन प्रती पाठवाव्यात; तसेच वरील १० व्या कलमात या प्रती विकत



घ्याव्या म्हटले आहे, त्याऐवजी फुकट (Gratis) द्याव्या असा बदल झाला. (Unrepraled Central Acts, Vol. I, Delhi P. 487). हा बदल नक्की केव्हा झाला हे मला कळले नाही.

प्रकाशनांच्या त्रैमासिक याद्या तयार करण्याकरिता या तीन प्रतींपैकी एक प्रत शिक्षण खात्याच्या ओरिएंटल ट्रान्स्लेटरकडे जाई. अशा प्रती रजिष्ट्रार ऑफ धि नेटिव पब्लिकेशन्सकडे चार पाच वर्षे पडून राहिल्या. वाङ्मयपरीक्षण झाल्यानंतर त्यांचा तेथे काही उपयोग नसल्यामुळे त्या सगळ्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या रजिष्ट्रारांकडे रवाना कराव्या असा ता. १९ जुलै १८७१ रोजी सरकारी हुकूम निघाला. त्याप्रमाणे ही पुस्तके दरवर्षी मुंबई युनिव्हर्सिटीकडे जाऊ लागली. पुढे सुमारे वीस वर्षांनंतर या पुस्तकांची परिस्थिती काय आहे याची सरकारने चौकशी केली. तिला त्यावेळचे युनिव्हर्सिटीचे रजिष्ट्रार Mr. D. Macdonald यांचे उत्तर गेले ते असे.

With reference to your letter no. 1691, dated 2th April last, I have the honor by direction of the Syndicate, to state that out of a total of 22,524 books received from the Registrar of the Native Publications 5,164 have been destroyed mainly through the ravages of white ants or are missing, and that the Syndicate regrets that want of convenient space and suitable cases or cupboards makes it increasingly difficult to properly care for the Native Publications. In these circumstances the Syndicate would be obliged if Govt. could make some other arrangement of keeping these books, and they to anyone who may be authorised to take charge of them.

मुंबई युनिव्हर्सिटीकडून असे चमत्कारिक उत्तर आल्यावर सरकारने मुंबई येथील रॉयल एशियाटिक सोसायटीकडे, तुम्ही तरी हे ग्रंथ ठेवाल काय अशी ता. १९ सप्टेंबर १८९० च्या पत्राने विचारणा केली. तिला ता. ८ ऑक्टोबरचे, त्यावेळचे सोसायटीचे सेक्रेटरी जव्हेरिलाल याज्ञिक यांचे उत्तर गेले ते असे :-

I have the honour to acknowledge your letter No. 3790, dated the 19th Sept. 1890. It was considered by the Committee of management at the meeting held yesterday. In reply I am desired to inform you that the Society has for some years past been inconvenienced for want of space to properly accommodate its own books that are regularly added to its library every year, by purchase and presentation. It actually required more room than is at present available for its annually increasing stock. Such being the case the Committee regret that it is not at all possible for them to take charge of the publications referred to in your letter.

Again, the present establishment of the Society is not sufficient for the additional work that will be thrown upon it by the acquisition of the native publications of the Presidency.

या दोनही संस्थांना ही पुस्तके नकोच होती; कारण ती जर त्यांना हवी असती तर आम्हाला जागेची सोय करा आणि कपाटे व कारकून द्या, अशी सरकारकडे त्यांना मागणी करता आली असती. अशी मागणी करून सरकारने ती फेटाळली असती तर त्यांना कदाचित दोष देता आला नसता. कदाचित म्हणण्याचे कारण सरकारने नकार दिल्यास देशी प्रकाशनांच्या रक्षणाकरिता लागणाऱ्या खर्चाकरिता स्थानिक दानशुरांकडे त्यांना हात पसरता आला असता. ''खरी युनिव्हर्सिटी म्हणजे ग्रंथांचा संग्रह होय'' हे कार्लाइलचे वचन युनिव्हर्सिटीला माहीत नसावे. देशी प्रकाशने म्हणजे केवळ रद्दीवजा, असा त्या लोकांचा समज असावा. एशियाटिक सोसायटीमध्ये चुकून एखादे मराठी किंवा गुजराथी पुस्तक जमा झाले असेल; पण पध्दतशीर संग्रह करण्याचा त्यांचा कधीही प्रयत्न नव्हता. अजूनही ही वृत्ती बदलेली दिसत नाही. काही महिन्यांपूर्वी 'विविधज्ञानविस्तारा'तील एक संदर्भ पाहण्याकरिता इकडील एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयात गेलो असता, ''मराठी मासिक आम्ही ठेवीत नाही,'' असे मला सांगण्यात आले. 'वाङ्मयात्मक व संशोधनात्मक तरी देशी भाषांतील नियतकालिके येथे ठेवणे आवश्यक आहे' असे मी म्हटल्यावर, ''आता फुकट मिळाल्यास त्यांचा संग्रह करू,'' असे मला तेथील एक अधिकारी म्हणाला !

पंचवीस-तीस वर्षांमागे मुंबई येथील दप्तरखान्यांतील जुनी मराठी वृत्तपत्रे काढून टाकल्याबद्दल तेथील अधिकाऱ्याकडे (हिंदी) मी नापसंती व्यक्त केली. त्यावेळी तो म्हणाला, ''आम्हाला (म्हणजे इंग्रज सरकारला!) तुमच्या मराठी वृत्तपत्रांची गरज काय?'' अशा प्रकारचे उत्तर अस्सल इंग्रजानेदेखील कधीही दिले नसते.

इंग्लंडातील एशियाटिक सोसायटीला हिंदुस्थानातील ग्रंथांचे संरक्षण व्हावे असे वाटले आणि तिच्या चालकांनी हिंदुस्थान सरकारला लिहिले म्हणून शंभर वर्षांमागे ग्रंथसंग्रहाची चळवळ सुरू झाली. प्रकाशनाच्या याद्या ज्या तयार होऊ लागल्या त्या परदेशी लोकांच्या माहितीकरिता. कॅटलॉग तयार झाला तो परदेशी लोकांच्या इच्छेला मान देण्याकरिता. हिंदुस्थान सरकारला किंवा आपल्या लोकांना जर खरोखरच ग्रंथसंरक्षणाची आस्था असती तर कॅटलॉग तयार करताना मिळतील तेवढे त्या काळातील ग्रंथ मिळवून यांचा संग्रह करण्यात आला असता. तसा प्रयत्न झाल्याचे मुळीच दिसत नाही.

युरोपात आद्य मुद्रितांना युरोप किंवा अमेरिका येथे फार महत्त्व आहे. १५०० पूर्वीची मुद्रिते बहुमोल गणली जाऊन त्यांना ''Incunbula'' (दोलामुद्रिते म्हणजे पाळण्यातील मुद्रण) असे नाव आहे. या कालातील पुस्तकाच्या किमतीसंबंधी



लिहिताना, 'a Gutenberg Bible to-day would cost anything upto Rs. 26 Lakhs,' असे अलीकडे प्रसिध्द झालेले वाचले. (The Times of India, 6 Oct. 65), अमेरिकेचा जन्मच मुळी या युरोपातील दोलामुद्रितांच्या १५०० या कालमर्यादेनंतर झाला. तेथील अत्यंत आरंभीच्या एका मुद्रिताच्या किमतीसंबंधी लंडन टाइम्सच्या लिटररी सप्लिमेंटमध्ये (२९-३-४७) पुढील मजकूर आढळतो :-

"On the evening of January 28, 1947, the highest price ever reached at auction by a printed book, viz. $ 151,000 (£37,750), was paid at the Parke-Bernet Galleries, New York, by the Rosenbach Company, for an unobtrusive, though handsomely bound, octavo, bearing no place or printer's name, but dated 1640, and entitled The whole Book of Psalmes, Faithfully translated into English Metre. Printed in fact, at Cambridge in New England, by Stephen Daye. The Bay Pslam Book, as it is commonly called, was the first printed book in English America".

वास्तविक या पुस्तकाची ही लिलावातील किंमत अपेक्षेपेक्षा कमीच आली. कारण Mr. William Dana Orcutt हा आपल्या From Library Walls (London 1946) या पुस्तकात या ग्रंथासंबंधी लिहितो,

"This volume is the most valuable book printed on paper in the world, worth even more than the famous Gutenberg Bible, a reasonable cash estimate being perhaps $ 2,50,000."

आपल्याकडे एखादे पुस्तक जुने म्हटले म्हणजे त्याची किंमत कमी, अशी कल्पना आहे. नवनीताच्या १८५४ सालच्या पहिल्या आवृत्तीची किंमत जर एखाद्या ग्रंथविक्रेत्याने दहा रुपये सांगितली तर आपले गिऱ्हाइक लगेच चिडून म्हणेल, ''सरकारी शतसांवत्सरिक नवनीताची सुधारून वाढविलेली नवी आवृत्ती तीन रुपयाला मिळते आणि ह्या शंभर वर्षांमागच्या पिवळट कागदाच्या जुन्या प्रतीला दहा रुपये? चार आण्याला देतोस तर दे!''

चालू शालेय क्रमिक वापरलेल्या जुन्या पुस्तकांची किंमत कमी होते खरी. सेकंडहँड पुस्तकांच्या दुकानांत निम्म्या किमतीला आणि फुटपाथवर त्याच्याहीपेक्षा कमी किमतीला अशी काही पुस्तके मिळू शकतात; पण दुर्मीळ ग्रंथांचे तसे नाही.

''बे साम बुक'' हे उपरिनिर्दिष्ट पुस्तक काहीसे 'नवनीता'सारखेच आहे. स्त्रोत्रे, प्रार्थना वगैरेचा तो संग्रह आहे. त्याची अलीकडे प्रसिध्द झालेली (१९५६) facsimlie म्हणजे यथामूल, (जुन्या पृष्ठांचे ब्लॉक करून नव्या कागदावर छापलेली) प्रत मजजवळ आहे. तिला मी ३७,७५० पौंड किंमत दिलेली नाही !

जुन्या पुस्तकांच्या किमती कशा वाढतात यासंबंधी, Lock, Stock and

Barrel (The story of Collecting) या पुस्तकात (१९४४) Rigby यांनी लिहिलेले आहे ते त्यांच्याच शब्दांत वाचा:-

"Few price rise can equal the record of Shakespeare First Folio, which sold originally for one quinea in 1623, brought thirty pounds in 1792, one hundred and twenty-one pounds in 1818; twenty thousand dollars (चालू भाव dollar = Rs. 4¾) early in the fabulous nineteen-twenties, century; and for which, in the fabulous nineteen-twenties, fifty thousand dollars was paid not once but seven times, while one price of sixty-two thousand dollars was recorded, and another of eighty-five thousand is bought to have been paid, all by private collectors. Rise in price very nearly as spectacular have been known to occur even within the span of a single collector's lifetime... Jerome Kern once paid four thousand dollars for a copy of the eighteenth-century English novel, *Tom Jones*, which, when his library was put up at auction four years later, brought him thirty nine thousand."

अशी आणखीही वाटेल तेवढी उदाहरणे देता येतील. जुन्या दुर्मीळ पुस्तकांचे सुधारलेल्या जगात महत्त्व केवढे आहे याची कल्पना यावरून वाचकांना होईल आणि मुंबई युनिव्हर्सिटीने आणि एशियाटिक सोसायटीने सरकारी पुस्तकांचा अव्हेर करून आपल्या संस्थांचे अजाणते केवढे नुकसान केले ते कळून येईल.

येथील परदेशी सरकारला या देशी ग्रंथांची आस्थाच नव्हती. ती असती तर त्यांनी स्वतंत्र इमारत बांधून आणि ग्रंथपाल नेमून त्यांचे रक्षण केले असते. स्थानिक दोन प्रमुख संस्थांकडून नकार मिळाल्यावर मुंबई सरकारने ता. १७-११-१८९० रोजी मुंबई युनिव्हर्सिटीच्या रजिष्ट्राराला पत्र पाठवून हे ग्रंथ येथील दप्तरखान्याकडे पाठवावे, असे कळविले. तेथे एल्फिन्स्टन कॉलेजच्या इमारतीतील तळमजल्यावरील गुदामामध्ये हे त्यावेळचे ग्रंथ आणि पुढे दरवर्षी ओरिएंटल ट्रान्सलेटरकडून याद्या केल्यावर येणारे ग्रंथ, पडून राहात. त्यांची नोंद, हिशेब किंवा व्यवस्था काही नव्हती. गठ्ठ्यांमागून गठ्ठे साचत होते. हा मी स्वत: डोळ्यांनी पाहिला आहे. त्यातील किती पुस्तकांना पंख फुटून ती उडून गेली असतील, त्याची गणती नाही!

१८६७ च्या कायद्याच्या प्रास्ताविका (Preamble) मध्ये त्याचे उद्दिष्ट सांगताना,

"Whereas it is expedient to provide for... the preservation of copies of every book printed or lithographed in British India,"

असा मजकूर आढळतो. हा कायद्याचा हेतू सफल झाला काय?



सदरील कायद्याप्रमाणे हिंदुस्थानात ठेवून घेण्यात येणाऱ्या एका स्थानिक प्रतीची शोककथा वर वर्णन केली. राहिलेल्या दोन प्रतींपैकी एक ब्रिटिश म्युझियम व दुसरी इंडिया ऑफिस यांच्याकडे पाठविण्याकरिता असत. पहिल्या प्रतीवरून केलेली त्रैमासिक यादी इंग्लंडात गेल्यावर ती पाहून त्यातील काही महत्त्वाच्या पुस्तकांच्या प्रती या संस्था मागवीत असे दिसते. कारण यांतील प्रत्येक पुस्तक संग्रहीत करण्यास त्यांच्याकडे जागा नसावी. अशा रितीने प्रत्येक मुद्रित पुस्तकाचे संरक्षण हे कायद्याचे उद्दिष्ट सफल कसे व्हावे?

दप्तरखान्याच्या वखारीमध्ये साचून पडलेल्या पुस्तकांचा उध्दार होण्याचा रंग १९१८ साली दिसू लागला. कारण त्या वर्षी या कॉपीराईट पुस्तकांची चार संग्रहालये स्थापन करण्याची सुबुद्धी हिंदुस्थान सरकारला झाली असे दिसते. मुंबई सरकारच्या शिक्षण खात्याने नं. २९८०, ता. ११ नवंबर १९१८ च्या हुकूमाने मुंबईच्या कलेक्टरच्या अध्यक्षतेखाली या प्रश्नाबद्दल आपले मत हिंदुस्थान सरकारला कळविण्याकरिता एक कमिटी नेमली. पण पुढे हे प्रकरण कुठे बारगळले ते कळत नाही!

पुढे १९३९ च्या डिसेंबरमध्ये मुंबई सरकारने एक लायब्ररी डेव्हलपमेंट कमिटी नेमली. मुंबईला एक मध्यवर्ती ग्रंथालय आणि पुणे, अहमदाबाद आणि धारवाड या ठिकाणी अनुक्रमे प्रादेशिक म्हणजे मराठी, गुजराथी आणि कानडी या भाषांची ग्रंथालये उघडावी असे ठरले. या कमिटीचा रिपोर्ट प्रसिध्द झाला आहे, पण त्या कमिटीच्या शिफारशींना मूर्त स्वरूप देण्याच्या मार्गात महायुध्द आड आले आणि हे प्रकरण थंडावले. पुढे महायुध्द संपल्यावर १९४७ साली या कार्याला गती मिळाली. पुण्यात एक प्रादेशिक ग्रंथालय उघडून त्याची व्यवस्था एका कमिटीकडे सोपविण्यात आली. वास्तविक लायब्ररी डेव्हलपमेंट कमिटीने आपल्या रिपोर्टात पुण्याच्या नगर वाचनालयाची प्रादेशिक ग्रंथालय म्हणून प्रथम शिफारस झाली होती; पण पुढे ही जबाबदारी तिकडच्या गुजरात विद्यापीठाकडे सोपविण्यात आल्याचे कळते. धारवाडच्या विद्यावर्धक संघाच्या ग्रंथालयाला प्रादेशिक ग्रंथालय म्हणून मान्यता मिळाली. इतके झाल्यावर आतापर्यंत जमलेली व पुढे दरवर्षी स्थानिक सरकारकडे येणारी मराठी, गुजराथी आणि कानडी पुस्तके, अनुक्रमे वरप्रमाणे पुणे, अहमदाबाद आणि धारवाड येथील प्रादेशिक ग्रंथालयांमध्ये जावीत असे ठरले. इतर भाषांची पुस्तके मुंबईच्या सेंट्रल लायब्ररीच्या (म्हणजे एशियाटिक सोसायटीच्या) ग्रंथालयाला मिळू लागली.

गुजराथी व कानडी भाषांच्या पुस्तकांचे पुढे काय झाले हे पाहण्याचे आज आपणास कारण नाही. पुण्याच्या प्रादेशिक ग्रंथालयांतील मराठी प्रकाशनांची व्यवस्था एका स्वतंत्र समितीकडे सोपविण्यात आल्याचे वर सांगितले. ती समिती १९५२ साली

विसर्जन पावली आणि हे काम आधी ठरल्याप्रमाणे पुण्याच्या नगर वाचनालयाकडे देण्यात आले. त्याही संस्थेने ही जबाबदारी नाकारल्यावर १८५८ साली ही कामगिरी म्युनिसिपालीटीवर सोपविण्यात आली आहे.

जुन्या दुर्मीळ ग्रंथांच्या दृष्टीने या पुण्याच्या प्रादेशिक संग्रहाला फार महत्त्व आहे. कारण नवी पुस्तके पैसे असल्यास वाटेल तितकी मिळू शकतील, पण काही जुनी दुर्मीळ पुस्तके कितीही पैसे दिले तरी मिळणे बहुंशी अशक्य आहे. १ जुलै १८६७ ते १९४७ म्हणजे सुमारे ऐंशी वर्षांची सर्व मराठी प्रकाशने या संग्रहात असावीत, अशी अपेक्षा आहे.

कै. शंकर गणेश दाते यांचा १८७४ पर्यंतच्या काळातील बहुमोल ग्रंथसंग्रह या (पुण्याच्या) प्रादेशिक ग्रंथसंग्रहाच्या चालकांनी मिळविला. म्हणजे मुळापासूनची प्रकाशने तिकडे आहेत. अशाप्रकारे या ग्रंथसंग्रहाचे महत्त्व फार मोठे आहे. म्युनिसिपालीटीच्या हवाली करण्यासारखा हा ग्रंथसंग्रह सामान्य नाही.

ग्रंथालयांचे वाचनालये आणि संग्रहालये असे दोन भेद पाडता येतील. वाचनालयाने मुख्यत: आजच्या वाचकांची गरज भागविण्याकरिता निवडक पुस्तके आपल्या ग्रंथालयांत ठेवावयाची असतात; तर संग्रहालयाने बरेवाईट, लहानमोठे, प्रत्येक पुस्तक व त्याची प्रत्येक आवृत्ती मिळवून भावी वाचकांची सोय पाहावयाची असते. नाटक कादंबऱ्या, रहस्यकथा आणि दिवाळी अंक अशांसारखे वाङ्मय पुरवणारी वाचनालये आज गल्लोगल्ली आढळतील. अलीकडे बहुतेक प्रत्येक ऑफिसात अशा वाङमयाची पुरवठा करण्याची सोय झाली आहे. परंतु वर सांगितलेली दुसऱ्या प्रकारची ग्रंथालये-म्हणजे संग्रहालये-सहजासहजी उभी होणे अशक्य असते. राष्ट्रीय ग्रंथालये ती हीच होत. अशा ग्रंथालयांकरिता सरकारने मुक्त हस्ताने पैसे खर्च केले पाहिजेत. ब्रिटिश म्युझियमच्या जनरल कॅटलॉगचा संपादक लिहितो,

The mission of the national library is the simplest: its character is determined for it by the enactment which in most civilised states constitutes it the general receptacle of the national literature, good, bad and indifferent, and imposes the corresponding obligation of rendering itself the epitome of foreign literatures, as far as its means allow. **Every such library is the mirror of its time, and perhaps even its services to contemporaries are of less real account than those which it performs for posterity in preserving the image of the past.**

"This is the apology of the librarian's anxiety to collect what the uninitiated regard as trash. Yesterday's news-sheet, waste paper to-day, will be precious after a century, and invaluable after



millennium. The same principle justifies the heavy expenditure which it is frequently necessary to incur in procuring what is truly illustrative of the history of a life or a nation, even when it comes in the costly shape of a bibliographical rarity".

यावरून राष्ट्रीय ग्रंथसंग्रहाचे आणि ग्रंथसंरक्षणाचे महत्त्व व उद्दिष्ट कळून येईल.

ग्रंथसंरक्षणाचा कायदा शंभर वर्षांपूर्वी पास करण्यात आला. त्याचा हेतू कसा फसला हे यापूर्वीही लोकांच्या नजरेस वेळोवेळी मी आणून दिले आहे. या कायद्याच्या शताब्दी-दिनाच्या प्रसंगी आपल्या मागील चुका लक्षात आणून त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ''आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं'' असा प्रकार यापुढे होऊ नये.

१८६७ च्या ग्रंथसंरक्षण कायद्याचे आजचे स्वरूप कसे आहे ते आता पाहू:-

(१) या कायद्यावर आधारलेल्या भारत सरकारच्या The Delivery of Books या १९५४ सालच्या अॅक्टअन्वये, प्रत्येक पुस्तकाच्या प्रकाशकाने आपल्या प्रकाशनाची एक प्रत कोलकोताच्या नॅशनल लायब्ररीला पाठवावी आणि अशाच प्रकारे आणखी तीन सार्वजनिक ग्रंथालयांना एक-एक प्रत पाठवावी असे ठरले आहे. तीन ग्रंथालये म्हटली म्हणजे, मुंबईची सेंट्रल लायब्ररी (एशियाटिक सोसायटी), मद्रासची कोनेमारा लायब्ररी आणि दिल्लीची नॅशनल लायब्ररी. (ही शेवटची लायब्ररी अद्याप अस्तित्वातच आली नसल्यामुळे सध्या प्रकाशकांना केवळ तीनच प्रती पाठवाव्या लागतात.)

(२) याच्या जोडीला महाराष्ट्र सरकारच्या ता. १५ सप्टेंबर १९६३ पर्यंत बदललेल्या १९२३ च्या The Bombay Press and Registration of Book Rules प्रमाणे,

(i) प्रत्येक मुद्रकाने आपल्या मुद्रित पुस्तकाच्या एक किंवा लागली तर आणखी एक किंवा दोन प्रती, The Examiner of Books, मुंबई यांच्या ऑफिसात पाठवाव्या.

(ii) तसेच हे पुस्तक जर मराठीचे असेल तर त्याची प्रत्येकी एक एक प्रत मुंबईच्या सेंट्रल लायब्ररीला, पुण्याच्या प्रादेशिक महाराष्ट्र ग्रंथालयाला आणि नागपूरच्या सेंट्रल लायब्ररीला पाठवावी. मराठीखेरीज इतर भाषेचे पुस्तक असेल तर त्याच्या दोन प्रती मुंबईच्या सेंट्रल लायब्ररीकडे पाठवाव्यात. म्हणजे प्रत्येक प्रकाशनाच्या आठ नऊ प्रती सरकारकडे जातात. ग्रंथसंरक्षण (Preservation of copies of every book) हे जे या कायद्याचे उद्दिष्ट त्या दृष्टीने त्याचा विचार करू :-

(१) केंद्र सरकारच्या कायद्याप्रमाणे तीन प्रती ज्या कोलकाता, मुंबई व मद्रास येथील ग्रंथालयांकडे जातात, त्या जर व्यवस्थित राखल्या गेल्या तर त्यांचे संरक्षण चांगले होईल. मात्र या ग्रंथांचा वाचनालयांतील ग्रंथांप्रमाणे उपयोग होऊ नये. विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता किंवा केवळ हौसेने मौजेकरिता वाचणाऱ्या लोकांना हे ग्रंथ देऊ नयेत. या ग्रंथालयांत स्थानिक भाषेतील ग्रंथांची खराबी जास्त होण्याचा धोका आहे. इतर भाषांतील ग्रंथांना मागणी नसल्यामुळे ते सुरक्षित राहातील; मात्र ते व्यवस्थित ठेवले पाहिजेत आणि कसर व वाळवी अशासारख्या कीटकाच्या भक्ष्यस्थानी पडणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे. नेहमी उपयोगात नसलेले ग्रंथ अशा रितीने नष्ट होण्याची भीती फार असते.

(२) प्रांतिक सरकारच्या नियमांप्रमाणे दुसरी आणखी एक प्रत मुंबईच्या सेंट्रल लायब्ररीकडे जाते. या दुसऱ्या प्रतीची आवश्यकता काय आहे ते कळत नाही. जेथे एक प्रत ठेवण्याची नीट जागा किंवा व्यवस्था नाही, तेथे गरीब प्रकाशकाकडून दोन प्रती घेणे अयोग्य आहे.

पुण्याचे प्रादेशिक ग्रंथालय हे संग्रहालय नसून वाचनालय दिसते. नागपूरची सेंट्रल लायब्ररी मी पाहिलेली नाही. तेही वाचनालयच असावे. कॉपीराइट ग्रंथ किंवा प्रकाशकाकडून विनामूल्य घेतलेली पुस्तके नित्याच्या वाचकांच्या उपयोगाकरिता वापरणे हे, कायद्याचे जे मूळ उद्दिष्ट संरक्षण (Preservation), त्याला विरोधी दिसते. कारण अशा रितीने त्या ग्रंथांचे संरक्षण होणे शक्य नाही.

ही प्रत वाचनालयाला देण्याऐवजी तिकडील विद्यापीठांच्या स्वाधीन केल्यास त्या पुस्तकांची जास्त चांगली निगा राखली जाईल आणि त्यांचे नीट संरक्षण होईल. मात्र नेहमीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता पाठ्यपुस्तके म्हणून हे ग्रंथ देऊ नयेत. केवळ संशोधकांना ते मिळावेत अशी विद्यापीठांना सक्त ताकीद देण्यात यावी.

दि एक्झामिनर ऑफ बुक्स अँड पब्लिकेशन्स यांच्याकडे जी पहिली प्रत जाते ती, तिच्यावरून सरकारी गॅझेटमध्ये प्रसिध्द करण्याकरिता त्रैमासिक यादी बनवावी आणि त्यांत आक्षेपार्ह काही मजकूर आढळल्यास तो सरकारच्या नजरेस आणावा, याकरिता असते. सरकारला जरूर लागल्यास अशा आणखी एक किंवा दोन प्रती मागविता येतात. यांपैकी एक्झामिनर ऑफ बुक्स, एक प्रत भारत सरकारकडे



पाठविण्याकरिता महाराष्ट्र सरकारच्या होम डिपार्टमेंटकडे पाठवितो व दोन प्रती लेजिस्लेटिव्ह खात्याच्या सेक्रेटरीकडे त्याच्या लायब्ररीकरिता निवड करण्याकरिता धाडतो; त्यांना नको असलेल्या प्रती महाराष्ट्र सरकारच्या क्युरेटर ऑफ लायब्ररीकडे जातात.

अशी या ग्रंथसंरक्षणाच्या कायद्याची आजची स्थिती आहे. इतर राज्ये पुढीलप्रमाणे प्रती घेतात :- आंध्रप्रदेश (३), आसाम (३), बिहार (१), दिल्ली (२), गुजरात (५), केरळ (२), मध्यप्रदेश (३), मद्रास (२), म्हैसूर (१), ओरिसा (२), पंजाब (२), उत्तर प्रदेश (१), पश्चिम बंगाल (२).

ग्रंथसंरक्षणाप्रमाणे वृत्तपत्रांच्या व इतर नियतकालिकांच्या संरक्षणाकडेदेखील लक्ष देणे आवश्यक आहे. अलीकडे तर दैनिकांच्या साप्ताहिक आवृत्यांमध्ये महत्त्वाचा मजकूर प्रसिध्द होत असतो. समाजाचे किंवा राष्ट्राचे प्रतिबिंब आपणास समकालीन वृत्तपत्रांमध्ये पहावयास सापडते. फार मोठी मान्यता पावलेल्या एखाद्या साहित्यिकाची किंवा अन्य पुरुषाची मागील कामगिरी पुढे मागे पहावयाची झाल्यास या वृत्तपत्रांच्या जुन्या फाइलींकडे धाव घ्यावी लागेल. ''कालचे वृत्तपत्र आपण आज रद्दी मानतो; परंतु एका शतकानंतर ते मूल्यवान ठरेल आणि हजार वर्षांनी अमोल होईल'', असे ब्रिटिश म्युझियमच्या जनरल कॅटलॉगच्या संपादकाचे उद्गार वर उध्दृत केले आहेत, ते या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहेत. बरीचशी जुनी पुस्तके आज वाचावयास मिळतात; परंतु वृत्तपत्रे पहावयासदेखील मिळत नाहीत. सध्याच्या कायद्याप्रमाणे वृत्तपत्राचा अंक प्रसिध्द झाल्याबरोबर अठ्ठेचाळीस तासांच्या आत मुद्रकाने त्याच्या दोन प्रती 'दि एक्झामिनर ऑफ बुक्स अँड पब्लिकेशन्स' याच्याकडे आणि एक प्रत मुंबईच्या 'क्युरेटर ऑफ लायब्ररीज' यांच्याकडे पाठवावयाची असते. त्याच्या संरक्षणाची काय व्यवस्था असते ते माहीत नाही. १८६७ सालच्या कायदयाचा उद्देशच मुळी वाङ्मयाचे 'प्रिझर्वेशन' (संरक्षण) हा आहे. लोकांच्या नित्याच्या वाचनाची गरज भागविणे हा त्याचा हेतू मुळीच दिसत नाही. अशा वाचनाची सरकारला व्यवस्था करावयाची असल्यास सरकारने वर्गणी भरून ही वृत्तपत्रे वाचनालयांना द्यावी. सरकारकडे वृत्तपत्रांच्या किंवा मासिकांच्या येणाऱ्या तीन प्रतींपैकी एका प्रतीची पुस्तके बांधून घ्यावी व त्यांचे रक्षण करावे; किंवा दर संपादक आपल्या उपयोगाकरिता पुस्तके बांधून घेतोच. त्या बरोबर त्याने सरकारला देण्याकरिता आणखी एक पुस्तक बांधून घ्यावे, असा नियम करावा. संपादक प्रकाशकांना विश्वासात घेऊन मागील वृत्तपत्रांचे किंवा इतर नियतकालिकांचे अंक मिळवून सरकारला त्यांचे संरक्षण करता येईल.

ग्रंथसंरक्षणांची आस्था बाळगणाऱ्या व्यक्तींनी, संस्थांनी आणि संपादकांनी भारतीय ग्रंथसंरक्षण कायद्याच्या या शताब्दीच्या प्रसंगी ती कशी साजरी करावी, याचा

खल करून या कायद्यात ग्रंथसंरक्षणाच्या दृष्टीने कोणत्या सुधारणा करता येतील हे सरकारला कळवावे.

१८६७ पर्यंत जे ग्रंथ प्रसिद्ध झाले त्या ग्रंथांची प्रदर्शने ठिकठिकाणी भरवावी व अशा पुस्तकांच्या पद्धतशीर यादया तयार कराव्या हे ग्रंथ केवळ मराठी असू नयेत. तर त्या काळच्या मुंबई इलाख्यात मुद्रित झालेल्या इतर भाषांच्या ग्रंथांचाही त्यांत समावेश व्हावा. मुंबई इलाख्याबाहेर इतर प्रांतांत व देशात प्रसिद्ध झालेल्या मराठी प्रकाशनाच्याही वेगळ्या याद्या तयार कराव्या आणि अशा सर्व याद्यांच्या सहाय्याने या ग्रंथांची एक संयुक्त यादी (Union catalogue) बनवून ती प्रसिद्ध करावी. या बाबतीत गुजरात व म्हैसूर या राज्यांतील सरकारांचे सहकार्य घ्यावे. प्रत्यक्ष न मिळालेल्या पण ब्रिटिश म्युझियम, इंडिया ऑफिस, दाते वगैरेंच्या कॅटलॉगमध्ये ज्यांचा अंतर्भाव आहे, अशा पुस्तकांचीही या संयुक्त यादीत नोंद करावी. इतकेच नव्हे, तर जी पुस्तके प्रत्यक्ष कोठेही अस्तित्वात असल्याचे नमूद नाही, पण जी मुद्रित झाल्याचा निर्देश सापडतो त्यांचीही संदर्भासह एका परिशिष्टात नावे द्यावी.

हा कायदा ज्यांनी प्रथम जन्मास घातला त्या आद्य प्रवर्तकांची सूचना ही प्रकाशने मोफत न घेता सरकारने विकत घ्यावी अशी होती, हे वरील विवेचनावरून कळून येईल. पुढे ती सरकारला मोफत द्यावी असा कायदा झाला आणि त्यांची संख्याही वाढविली! या शताब्दीच्या प्रसंगी ही प्रकाशने सरकारकडे पाठविताना मुद्रकांना आणि प्रकाशकांना पोस्ट खर्चाशिवाय पाठविता यावी, अशी सरकारने व्यवस्था करणे योग्य होईल.

## संदर्भ

(१) अ. का. प्रियोळकर : *मराठी संशोधन पत्रिका* वर्ष-१३, अंक-२, जाने. १९६६, पृ. १ ते १६.